मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१५ ■ गुरुवार, १६ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## ज्ञानाची श्रीमंती वाटणारा वाढदिवस



**शाळेचा आदर्श विद्यार्थी कु.आदर्श संजय तळेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय संविधाना ची प्रत शाळेस भेट देऊन दिला आदर्श संदेश! भेट छोटी नाही, विचार मोठा – संविधान देऊन घडवतोय जागरूक नागरिक! पालकांचे संस्थेच्या वतीने खूप खूप आभार!**

**( दैनिक युवक आधार )**

# संशोधन, जिज्ञासा आणि निरंतर शिकण्याची वृत्ती आत्मसात करा – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**नागपूर :** वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावाबरोबरच आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती जपायला हवी. वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे स्थान सर्वतोपरी आहे. जिज्ञासा, संशोधन आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती आत्मसात करा.

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची जागा घेऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रात यशासह करुणेचा भाव जपल्यास तुम्ही एक उत्तम व्यक्तीही होऊ शकाल, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.



केंद्रीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) द्वितीय दीक्षान्त समारंभ आज संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपले हे विचार मांडले. या समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, नागपूर एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

### २१० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात विविध कोर्समध्ये अव्वल आलेल्या आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात पदवीप्रदान करण्यात आली. त्यानंतर दीक्षान्त समारंभात एकूण २१० विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीच्या गौरवार्थ पदव्या व सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. यामध्ये १२९ एमबीबीएस, २९ एमडी/एमएस, ३५ बी.एस्सी. (ऑनर्स) नर्सिंग, ५ एम.एस्सी. आणि १२ संलग्न व आरोग्यसेवा शाखांतील पदवीधरांचा समावेश आहे.

उपस्थित वैद्यकीय विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, वैद्यकीय क्षेत्र हा केवळ एक व्यवसाय नसून संवेदनशीलतेने मानवतेची सेवा करण्याचा एक मार्गही आहे. एक वैद्यकीय चिकित्सक केवळ आजारांवर उपचार करत नाही, तर तो आजाराने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मनात आशेचा संचारही निर्माण करतो. चिकित्सकाचा सहानुभूतीचा सल्ला केवळ आजारी व्यक्तीलाच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांनाही आधार देतो.

अनेकदा डॉक्टरांसमोर कठीण परिस्थिती निर्माण होते.

## निवडणूक, संजय गांधी निराधार योजना, अर्जांची जबाबदारी तहसील कार्यालयाची

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेलमध्ये पनवेल तहसील कार्यालय आणि अपर तहसील कार्यालय असे दोन कार्यालय आहेत. महसुली कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाजाबाबत निवडणूक, संजय गांधी निराधार योजना, अर्ज, निवेदने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी मुख्य तहसील कार्यालयाची असणार आहे.पनवेलमध्ये दोन तहसील कार्यालय असल्याने कामकाजाबाबत जबाबदारी नेमून देण्यात आली नव्हती. त्यामुळे आता शासनाने दोन्ही तहसील कार्यालयाची जबाबदारी निश्चित केली आहे. इतर कामकाज संपूर्ण तालुक्यासाठी हाताळण्याचा अधिकार हे मूळ तहसील कार्यालयास राहतील तसेच महसुली कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाज निवडणूक, संजय गांधी निराधार योजना व इतर अर्ज, निवेदने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी मुख्य तहसीलदार कार्यालयाची (साईनगर, पनवेल) असणार आहे. पनवेलच्या अपर तहसील कार्यालयासाठी सात पदांची नेमणूक करण्यात आली आहे. यात एक तहसीलदार, एक नायब तहसीलदार, एक सहाय्यक महसूल अधिकारी, तीन महसूल अधिकारी आणि एक वाहन चालक यांचा समावेश आहे.

तहसील कार्यालय, अपर तहसील कार्यालय तसेच इतर कार्यालयांच्या पातळीवर स्थायी आणि अस्थायी पदे कार्यरत आहेत. या पदांचा विचार करून सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आला आहे.

तहसीलदार कार्यालयाचे कार्यक्षेत्र निश्चित करताना मंडळ हा घटक समजण्यात येऊन एकाच मंडळ कार्यालयाचे दोन तहसीलदार कार्यालयामध्ये विभाजन करू नये. संपूर्ण मंडळ कार्यालय एकाच कार्यालयाकडे राहील याची दक्षता घ्यावी.

## बाबासाहेब म्हणजे परिवर्तनाची क्रांती!” कोकलगावात घुमले गोपाल भिसडे पाटील यांचे विचार

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : 13 एप्रिल 2026 रोजी कोकलगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध व्याख्याते गोपाल भिसडे यांनी आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थितांना प्रेरित केले.

आपल्या भाषणात गोपाल भिसडे म्हणाले की, “बाबासाहेब म्हणजे परिवर्तनाची क्रांती होय. त्यांनी बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश देत वैचारिक गुलामगिरीतून मुक्त केले आणि स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था घडवली.” त्यांच्या कार्यामुळेच उपेक्षित व वंचित समाजाला नवसंजीवनी मिळाली असून आजच्या प्रगत भारताच्या उभारणीत त्यांचे योगदान अतुलनीय आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजनांसाठी प्रगतीची दारे खुली केली. भारतीय संविधानाद्वारे प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क, अधिकार आणि कर्तव्ये बहाल करून समाजातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणले. महिला, कामगार, विद्यार्थी आणि शेतकरी यांच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, असेही भिसडे यांनी सांगितले.



याचबरोबर समाजातील अंधश्रद्धा, अन्यायकारक रूढी-परंपरा आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध त्यांनी उभारलेल्या प्रबोधन चळवळीचा उल्लेख करत, “बाबासाहेबांनी दिलेला विज्ञानवादी दृष्टिकोन आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केला. या प्रसंगी कोकलगाव येथील बहुसंख्य समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या मुख्यालयाचे धारावीत उदघाटन !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे /प्रतिनिधी )** : मुंबईत समस्त कक्कय्या महासंघाचे महाअधिवेशन होणार असून समाज बांधवाना या निमित्त एकमेकांच्या विचाराची देवानघेवाण व्हावी, महाअधिवेशन यशस्वीरित्या पार पडावा यासाठी धारावीत न्यू म्युनिसिपल चाळ येथे मध्यवर्ती मुख्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.




मुख्यालयाचे उद्घाटन श्री.निवृत्ती सावळकर (अध्यक्ष) यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या वतीने साजरी करण्यात आली.या प्रसंगी मनोज शिंदे व नवीन चाळ कमिटी यांनी कार्यालय उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. तसेच यासाठी परिश्रम

घेतलेल्या राम कोकणे, संदेश शिंदे,संजय शिंदे (मुंबई प्रदेश) यांचे विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. शशिकांत सोनावणे (प्रवक्ता, प्रभारी) यांनी केली. त्यांनी महासंघाच्या महा अधिवेशनाची तयारी, सर्व मंडळांचा सहभाग, तसेच अधिवेशनाचे उद्दिष्ट आणि ढोर कक्कय्या समाजासाठी होणारे फायदे याविषयी मार्गदर्शन केले.अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांनी कार्यालयासाठी सहकार्य करणाऱ्यासर्वांचे आभार मानले. धारावी टीम व महिला वर्गाची उत्साही उपस्थिती पाहून आनंद व्यक्त केला आणि अधिवेशनाबाबत सविस्तर माहिती दिली.जयंती विशेष विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान व आरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यांचे उपकार कधीही विसरता येणार नाहीत, असे विचार श्री. शशिकांत सोनावणे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला एम. वाय. शिंदे, नागनाथ कोकणे, चंद्रकांत कोकणे, शिवलिंग व्हटकर,लहू कोकणे, सुखदेव शिंदे,जितेंद्र सोनावणे,मनोज शिंदे धारावीतील महासंघाचे पदाधिकारी, मुंबई टीम आदि महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.समारोप कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी संत कक्कय्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची घोषणाबाजी करत उत्साही वातावरण निर्माण केले.

## राज्यस्तरीय मंथन परीक्षेत घवघवीत यश; कु. हर्ष शेखर म्हात्रे उरण तालुक्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** नुकत्याच जाहीर झालेल्या राज्यस्तरीय मंथन परीक्षेच्या निकालात रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाले, उरण येथील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी हर्ष शेखर म्हात्रे याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.हर्षने उरण तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून, रायगड जिल्ह्यात १९ वी आणि महाराष्ट्र राज्यात २४ वी रँक मिळवत घवघवीत



यश संपादन केले आहे. इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने राज्य पातळीवर चमक दाखवल्याने शाळेच्या व गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.या यशाचे श्रेय हर्षच्या पालकांनी मार्गदर्शक प्रशांत कोळी सर आणि चैताली म्हात्रे मॅडम यांना दिले आहे. "सर आणि मॅडम यांनी घेतलेली मेहनत, नियमित सराव आणि कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळे हे यश मिळाले," अशी प्रतिक्रिया हर्षच्या पालकांनी दिली.हर्षच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी त्याचे व दोन्ही मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित कर्यक्रमांना स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिली भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी जयंती महोत्सवात सहभाग घेतला.यावेळी त्यांनी पनवेल महानगरपालिकेने आयोजित केलेल्या



मिरवणुकीमध्ये उपस्थिती , जासई ,हकरंजाडे वडघर, दर्शवली . त्याचबरोबर ओवळे वडघर , डेरवली , घोट , तळोजे मजकूर ,रसायनि, घोट कॅम्प, रोडपाली, पिसार्वे , काळुंद्रे इत्यादी ठिकाणी जयंती निमित्त उपस्थिती दर्शवली, त्याचबरोबर पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने एक विरा झोपडपट्टी भिंगारी येथे बाबासाहेबांची जयंती साजरी केली , त्यावेळी ते उपस्थित होते, त्यांच्यासोबत नरेंद्र गायकवाड, विजय गायकवाड,ह नितीन कांबळे इत्यादी मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

## तथागत बौद्ध विहार, प्रेरणा नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत / नागपूर** : तथागत बौद्ध विहार, प्रेरणा नगर, नागपूर येथे रमाई महिला मंडळ द्वारे चक्रवर्ती सम्राट अशोक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कार्यक्रम १३ एप्रिल जयंतीच्या निमित्ताने पूर्व संध्या ला आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला मी रमाई बोलतेय हा नाट्यविष्कर शोभा गौतम पाटील यांनी सादर केली, त्यांना गौतम पाटील यांनी सुरेख साथ दिली.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य कार्य कारणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी बुवाबाबा लोंकांना चमत्कार करून लुबाडतात त्याचे सादरीकरण केले. प्रा. नाना शेंडे व तथागत विहारांमधील ज्येष्ठ सभासद यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.प्रा .बापूराव तागडे, प्रा.दिनकर खोब्रागडे ,संगीता मेश्राम, डॉ.विलास ढबाले ,संध्या ढबाले कमलताई शेंडे, कल्पना तागडे, शिल्पा गावंडे ,शोभाताई खोब्रागडे ,संजय देवगडे ,हरेश्वर सहारे ,राहुल दमके ,अन्य मान्यवर बौद्ध उपासक उपासिका कार्यक्रमाला हजर होते.



# नवनाथ नगर येथील झोपडीधारकांचे उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या नवनाथ नगर झोपडपट्टीतील काही झोपडी धारकांना त्यांच्या झोपड्यांसाठी नगरपरिषद असतानाच्या कालखंडामध्ये कर पावती दिली जात होती. मात्र महापालिका अस्तित्वात आल्यानंतर त्या झोपडीधारकांना अवैध ठरवून त्यांची कर पावती रद्द करण्यात आली. वास्तविक गेले अनेक वर्षे तिथे राहत असलेल्या या झोपडीधारकांना अवैध ठरवल्यामुळे पालिकेकडून त्यांच्या डोक्यावर कारवाईची टांगती तलवार ठेवण्यात आली आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण उघड्यावर येऊ ही भीती या नागरिकांना सतावत आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेतर्फे त्यांच्या झोपड्यांना पुन्हा एकदा कर पावती सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी सदर नवनाथ नगर झोपडी धारकांनी पनवेल महानगरपालिकेच्या प्रांगणात उपोषणाला सुरुवात केली आहे. बुधवारी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन, त्यांचा प्रश्न व त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. यावेळी अरविंद म्हात्रे यांनी सदर झोपडीधारकांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.



यावेळी उपोषणकर्त्यांनी अरविंद म्हात्रे यांचे आभार मानताना, अरविंद म्हात्रे यांच्यासारखा अभ्यासू विरोधी पक्षनेता आमच्या समस्या जाणून घेऊन आम्हाला लवकरात लवकर न्याय मिळवून देईल, असा विश्वास व्यक्त केला.यावेळी नगरसेवक हरेश केणी, गटनेते केतन म्हात्रे, नगरसेवकप्रकाश म्हात्रे, नगरसेवक राम पाटील, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# स्व. प्रा. डॉ. गंगाधर पाटील स्मृती काव्य स्पर्धा खिडकी-अलिबाग येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर/सौ. निलिमा झिंजे :** कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा अलिबाग आणि व्ही. जी. पाटील एज्युकेशनल फाऊंडेशन, खिडकी-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. प्रा. डॉ. गंगाधर पाटील स्मृती काव्य स्पर्धा (वर्ष ४ थे) रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता खिडकी, ता. अलिबाग येथे सर्व आदरणीय मान्यवर, प्रतिभावान कवी, समीक्षक व दर्दी रसिक यांच्या उपस्थितीत दिमाखदार पद्धतीने संपन्न झाली.

उदयोन्मुख कवींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक व कवी मा. श्री. अरुण म्हात्रे सर होते. तसेच हास्य जत्रा फेम मा. श्री. संजीवन म्हात्रे सर, कोकण मराठी साहित्य परिषद शाखा अलिबागचे अध्यक्ष मा. श्री. रमेश धनावडे सर, तसेच शाखेच्या ज्येष्ठ सल्लागार व माजी उपाध्यक्षा सौ. सुजाता पाटील मॅडम उपस्थित होत्या.



या कार्यक्रमात अनेक कवींनी सहभाग घेतला होता. उपस्थित मान्यवरांनी कवितेची निवड, विषय, आशय, शैली, शब्दसौंदर्य, लय, सादरीकरण आणि प्रभाव या निकषांवर आपापली मते व्यक्त केली. या सर्व बाबींचा विचार करून परीक्षकांनी निकाल जाहीर केला.

स्पर्धेतील विजेते :

प्रथम क्रमांक – अनिल भोईर

द्वितीय क्रमांक – मनोहर वाळींबे

तृतीय क्रमांक – विजयकुमार म्हात्रे

उत्तेजनार्थ पारितोषिक विजेते :

१) आशिष चौबळ

२) अजय भोईर

३) प्रथमेश कासार

४) सागर थळे

५) रमेश कांबळे

विजेत्या स्पर्धकांना आयोजकांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक, रोख रक्कम व पुस्तक देऊन गौरविण्यात आले. विजेत्या कवींना उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

तसेच

१) मा. श्री. अनंत केशव देवघरकर

२) मा. श्री. काशीनाथ मढवी

३) मा. श्री. श्रीकांत पांडुरंग कवळे

४) मा. श्री. दिलीप गजानन पाटील

५) मा. श्री. विलास नाईक

६) मा. सौ. संध्या विजय दिवकर

या प्रतिभावंत साहित्यिकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले व त्यांना स्व. प्रा. डॉ. गंगाधर पाटील स्मृती साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल आदरणीय श्रीमती निर्मला फुलगांवकर यांना स्व. प्रा. डॉ. गंगाधर पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून व्ही. सी. पाटील, सौ. मिनल तवटे व सौ. दिप्ती कुलकर्णी यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील दिग्गज, साहित्यिक, कवी, लेखक, कलाकार, पदाधिकारी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दिमाखदार व यशस्वी कार्यक्रमाची धुरा व्ही. जी. पाटील एज्युकेशनल फाऊंडेशनचे विश्वस्त, सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक मा. श्री. आल्हाद पाटील सर तसेच खिडकी ग्रामपंचायतीचे सरपंच मा. श्री. वैभव पाटील सर यांनी सांभाळली. संदीप पाटील, सौ. उज्वला पाटील, सौ. अंजली पाटील, सौ. मेघलता पाटील, रमेश पाटील, प्रसन्न पाटील, क्रांती पाटील, राजीव पाटील, जगदीश पाटील, हेमंत पाटील आदी खिडकी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

# जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची१३५वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**डोंबिवली प्रतिनिधी/ गुरुनाथ तिरपणकर :** डॉ.भिमराव रामजी आंबेडकर हे केवळ व्यक्ती नव्हते, तर ते एक विचार होते.त्यांची जयंती साजरी करणे म्हणजे भारतीयांना आनंदचा क्षण असतो.त्याच अनुषंगाने जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने डोंबिवली येथील कल्याण डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली कार्यालयाजवळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाला अभिवादन करून१३५वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सर्व प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाला प्रमुख पाहुणे भारतीय पोलीस सेवा दलातील आयपीएस अधिकारी शिवम वखरे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच इतर प्रमुख पाहुणे भंडारी मंडळाचे विश्वस्त संजय पोखरणकर, उद्योग ऊर्जा बिझनेस संस्थेचे संस्थापक जादुगार अभिजित(भगवान पवार), क्राईम बॉर्डर पोलीस पत्रकार राजेंद्र वखरे, कवयित्री, निवेदिका, गायिका सुनिता काटकर, स्वानंद इन्व्हेस्टाच्या संचालिका चित्रा राऊत, म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या संचालिका शर्मिला केसरकर,आयसाईट फिनट्रेड प्रा.लि.चे पार्टनर अभिषेक मुणगेकर, भंडारी मंडळाचे अध्यक्ष रजनिश चौगुले, सिंधुदुर्ग जिल्हा मित्र मंडळाचे गोविंद म्हाडगुत, भंडारी मंडळाचे विश्वस्त रघुवीर तांडेल, सरचिटणीस महेश पारकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे,सिध्दपा भोरकडे,खजिनदार दत्ता कडुलकर, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे दर्शन घेऊन अभिवादन केले. अशा या महामानवाला कोटी कोटी प्रणाम!! सर्व उपस्थित प्रमुख पाहुण्यांना अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, खजिनदार दत्ता कडुलकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांच्या हस्ते शाल, गुलाब पुष्प,कार्य अहवाल, आकर्षक पेन व आभार पत्र प्रदान करुन यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे, खजिनदार दत्ता कडुलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



# कुंभार समाज, मुंबईत श्री संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी :** मंदिराचा इतिहास सांगताना, श्री संत गोरा कुंभार (बाबा) यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना शके १९०९, वैशाख वद्य द्वादशी, रविवार दि. २४ मे १९८७ रोजी करण्यात आली होती. तसेच मंदिराचा जिर्णोद्धार मार्गशीर्ष वद्य १२, बुधवार दि. ६ जानेवारी २००० रोजी संपन्न झाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कुंभार समाज, मुंबई यांच्या वतीने संतश्रेष्ठ श्री गोरोबाकाका (गोरा कुंभार) यांची पुण्यतिथी आज करी रोड (पूर्व), मुंबई येथील श्री गोरा कुंभार (बाबा) मंदिरात भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी १०.०० वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली असून, मोठ्या संख्येने समाजबांधव व भाविक उपस्थित होते.

पुण्यतिथीनिमित्त मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांची आरास, दीपप्रज्वलन आणि पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करण्यात आली.



संत गोरोबाकाका यांच्या मूर्तीला फुलांच्या माळा अर्पण करून अभिषेक करण्यात आला. यावेळी नामस्मरण, भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात समाजातील ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. यावेळी संत गोरोबाकाका यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या साधेपणा, परिश्रम आणि भक्तीभाव यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक स्थान असल्याचेही वक्त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे आयोजन कुंभार समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे करण्यात येते. समाजातील ऐक्य, परंपरा आणि संस्कृती जपण्याचा हा एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. उपस्थितांनी प्रसादाचा लाभ घेतला आणि कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.या वेळी श्री. विष्णू शिवराम माळेवाडकर (अध्यक्ष), श्री. संजय जगन्नाथ गिरकर (सचिव) तसेच श्री. सदाशिव भानू चिंदरकर (मुख्य सल्लागार) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांचे आभार मानले. तसेच इंदू मिलचे मॅनेजर श्री. सोमाणी यांची उपस्थिती होती आणि श्री. कृष्णा गोविंद चिंदरकर हे देखील कार्यक्रमास उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान शिबीर लोणीकंद पुणे

**दैनिक युवक आधार**

**राजेभाऊ शिकारे हवेली तालुका प्रतिनिधी/पुणे :** 'विकसित भारत-२०४७' संकल्पाप्रमाणेच 'विकसित महाराष्ट्राच्या' संकल्पपुर्तीच्या दृष्टीने समाजातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी विविध लोककल्याणकारी योजना शासन राबवित आहे. त्याअनुषंगाने लोकाभिमूख, गतिमान आणि पारदर्शक निर्णय घेत मागील दोन महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला साजेसं काम राज्य शासनाच्या वतीने केले गेले आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

लोणीकंद (ता. हवेली) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित समाधान शिबारात ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद, माजी आमदार पोपटराव गावडे, अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत, प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार तृप्ती कोलते, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, जिल्हा परिषद सदस्य किरण साकोरे, राजेंद्र गावडे, दीपाली राहुल गव्हाणे, स्वाती दत्तात्रय पाचुंदकर, नगरसेवक रामभाऊ दाभाडे, अनिल सातव, रत्नमाला संदीप सातव, पंचायत समिती सदस्या मोनिका श्रीकांत कंद, राणी दत्तात्रय वाळके, सरपंच सुप्रिया जयआप्पा कंद आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. बावनकुळे साहेब म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शी प्रशासन होते, या त्रिसुत्रीची प्रेरणा घेऊन अभियानाला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर असे नाव दिले आहे. या शिबीरात जवळपास २० गावांतील नागरीकांना विविध विभागाच्या ४५ सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, त्यामुळे येत्या काळात सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात बदल घडविण्यास मदत होणार आहे.

या शिबिरच्या माध्यमातून राज्यामध्ये पहिल्या टप्प्यात ४० हजार फेरफार दुरुस्ती, २० हजार सातबारा दुरुस्ती, १ लाख ५० संगणकीकृत सातबाऱ्याचे वाटप, ७५ हजार ८ अ नोंदीचे वाटप, १ लाख ७५ हजार विविध प्रकारचे प्रमाणपत्राचे वाटप, ३४ हजार एक खिडकी योजनेच्या माध्यमातून प्रमाणपत्र वाटप, २ हजार कमी जास्त पत्रक तयार केले, ५०० गावातील दस्तावेज दुरुस्ती करण्यात आले आहे, पुणे जिल्ह्यात १३ हजार ३३ दाखल्याचे वितरण करण्यात आले. एकूणच सुमारे ५ लाख परिवाराला शिबाराचा लाभ देण्यात आला असून खऱ्या अर्थाने मागील दोन महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला साजेसं काम राज्य शासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांच्या जीवनात महसूल आणि गृहखात्याचे महत्वाचे आहेत, त्यादृष्टीने इतर खातेही पुढे नेण्याचे काम सुरु आहे. २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे अधिकाराचे विकेंद्रीकरण करून राज्यातील एकही नागरिक बेघर राहणार नाही, याबाबत नियोजन करण्यात आले आहे. बाजार मूल्य भावामध्ये वाढ न करण्याचा निर्णय, खासगी सर्व्हेअरची नेमणूक, भुमि अभिलेख अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समोवश, शेतजमीन अकृषक करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी करण्यात आली आहे. महसूल विभागातील पदोन्नतीचा विषय मार्गी लावण्यात आला. महसूल विभागाला बळकटीकरण करण्याच्यादृष्टीने महसूल विभाग, नोंदणी व मुंद्राक विभाग आणि भुमि अभिलेख विभागाचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता हवेली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये वेगळी ग्रामसभा घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी हवेलीचे सभापती युवराज काकडे यांचे अभिनंदन केले. हा निर्णय राज्यात लागू करुन ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा लागू करण्यात येईल. या योजनेच्या माध्यमातून येत्या ५ वर्षात सर्व शेत रस्ते, पाणंद रस्ते तयार करण्यात येणार आहे.

दरम्यान नागपूर जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या नवसखी योजनेअंतर्गत २ हजार २०० महिला बचत गटांना एक लाख रुपये फिरते भांडवल देण्यात येत आहे. या योजनांची पुणे विभागातही अंमलबजावणी करण्याची सूचनाही मंत्री श्री. बावनकुळे यांनी विभागीय आयुक्तांना केली.

येत्या काळात 'पीएमआरडीए' क्षेत्रात




तुकडेबंदी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत लवकरात लवकर बैठक घेवून सूचना देण्यात येईल. भामा-आसखेडसंदर्भात शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर असलेली शेरे कमी करण्याबाबत लवकरच पुनर्वसन मंत्री, विभागीय आयुक्त यांच्यासोबत बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल. तसेच वढु खुर्द सारख्या गावांच्या देवस्थानाच्या नावे असलेल्या इनाम जमिनीबाबत येत्या अधिवेशनात कायदा करण्यात येईल. हवेली तालुक्यात लोणीकंदला स्वामित्व योजनेत आणून भूमिअभिलेख विभागाच्या वतीने ड्रोन सर्वेक्षण करुन मालमत्ता पत्रक आणि सनद देण्यात यावे. याकरीता खासगी सर्व्हेअर तातडीने नेमणूक करुन गतीने मोजणी करावी. लोणीकंद येथे सलोखा योजनेमध्ये १५० हेक्टर जागेचा प्रस्ताव तसेच ग्रामपंचायतीकडून लोकोपयोगी कामे करण्यासाठी शासकीय जागेचा प्रस्ताव आल्यास त्वरीत निर्णय घेण्यात येईल. तसेच कार्यक्रमात मागणी केलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करुन तातडीने अडीअडचणी सोडविण्यात येतील, अशीही ग्वाही श्री. बावनकुळे यांनी दिली.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, नागरिकांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यत सर्व प्रकारचे दस्ताऐवज सांभाळणारा महसूल विभाग शासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. नागरिकांचे जीवनमान सुखकर व्हावे, त्यांना जलदगतीने सेवा देण्याकरिता या विभागाच्या वतीने आयोजित अशा प्रकारची शिबीरे नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यासह योजनांची माहिती होण्यासाठी उपयुक्त आहेत. जिल्ह्यात मतदार यादी विशेष पुन:र्निरीक्षण कार्यक्रम, भारतीय जनगणना-२०२६, शेतकरी ओळखपत्र काढण्याच्या कामात नागरिकांनी सक्रीयपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री. पुलकुंडवार यांनी केले.

श्री. राऊत यांनी महाराजस्व अभियानाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव दिल्याबद्दल विभागाच्यावतीने कृतज्ञता व्यक्त केली. प्रदिप कंद म्हणाले, ' पै.संदीप भोंडवे यांनी तीन वेळा उपोषण केलेले भामा आसखेडचे शेरे काढावेत, वढु खुर्द गावात सातबाराचे महसुली प्रश्न सुटावेत, सभापती युवराज काकडे यांचे प्रयत्नातून पाणंद रस्ते खुले व्हावेत, गावठाणा पासून २०० मीटर अंतरावर रितसर सनद द्यावी. लोणीकंद येथे १५० एकरात शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्वावर रितसर महसुली हिस्से करून द्यावेत, गायरानाची जागा सार्वजनिक कामाकरीता द्यावी. क्रिडा संकुल व इतर कामे मार्गी लागावीत, आदी मागण्या करुन कॅबिनेट बैठक असताना शिबिराला उपस्थित राहील्याबद्दल त्यांनी महसुल मंत्र्यांचे आभारही मानले.

जिल्हा परिषद सदस्य किरण साकोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तर डॉ. माने यांनी प्रास्ताविकात, या समाधान शिबीरात हवेली उप विभागात देण्यात आलेल्या लाभांबाबत माहिती देत नियमित कामांच्या उद्दिष्ट पूर्तीबरोबरच आगामी काळातही नागरिकांना अशाच प्रकारे सेवा देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

दरम्यान महसूल विभागाचा आकृतिबंध मंजूर केल्याबद्दल मंत्री श्री. बावनकुळे यांचा सत्कार कार्यक्रमात करण्यात आला. तसेच श्री. बावनकुळे यांच्या हस्ते मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना प्रातिनिधिक स्वरुपात लॅपटॉपचे वितरणही करण्यात आले. तसेच विविध विभागाच्या पात्र लाभार्थ्यांना श्री. बावनकुळे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात लाभही देण्यात आला.

सुरुवातीला महसुली सेवांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच श्री. बावनकुळे यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या विविध स्टॉलला भेटी देवून माहिती घेतली.

# जनता विद्यालय मुल्हेर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी -दीपक गायकवाड** : डांग सेवा मंडळ नाशिक संचलित जनता विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय मुल्हेर येथे महामानव, भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री एस.सी. धात्रक सर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डांग सेवा मंडळ संस्थेचे संचालक श्री अनिलजी पंडित भाऊसाहेब, पर्यवेक्षक श्री पी.आय.शेख हे होते. यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कु.वैदेही खरे, पुष्पांजली जगताप, ईश्वरी सोनवणे, अनन्या सोनवणे, केतकी सोनवणे, सिद्धार्थ सोमवणे, संघप्रिया पवार, वर्षा शिंदे, अक्षरा भानसे, दिप्ती भामरे, तनुजा साबळे, वैष्णवी गांगुर्डे या विद्यार्थ्यांनी डॉ.भिमराव आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव आपल्या मनोगतातून व्यक्त केला. शिक्षकांच्या वतीने श्री. डी.जे.पवार, श्री.एस.एस.मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य धात्रक सर यांनी डॉ.आंबेडकरांच्या विविध कार्याचा गौरव करून त्यांचा एकतरी गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चंद्रकांत येवला यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# तळा तालुक्यामध्ये महामानवांचा जयंती उत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर** : भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा, तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था रजिस्टर रायगड, वंचित बहुजन आघाडी तालुका तळा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष धर्मा लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तळा येथे संपन्न झाला. यावेळी स्वागताध्यक्षपदी केशव लोखंडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिमराज जाधव यांनी केले.



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, सभापती नथुराम मुकण, गट विकास अधिकारी महादेव शिंदे, तळा तहसिलदार स्वाती पाटील, तळा तलाठी अंकिता झाडे, समाजसेवक ऍड उत्तम जाधव, अंधश्रद्धा निर्मूलन समिती रायगड जिल्हा प्रधान सचिव महेंद्र पाटेकर, जिल्हा समिती सामाजिक जाणीव व जागृती विभाग कार्यवाह डॉ. दत्ता कुंटेवाड, तळा शाखा कार्याध्यक्ष सुनील बैकर, उपाध्यक्ष भिमराज जाधव, अंनिसच्या विविध विभागाचे कार्यवाह बुद्धरत्न भवरे, सचिन भाटे, स्वप्नील वरंडे, मुजफ्फर शेख, सत्य पोलिस टाईम्सचे संपादक डी. टी आंबेगावे, पांडुरंग गायकवाड, अक्षता काते, साक्षी गायकवाड, रमेश हिलम आदी मान्यवर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे तिन्ही संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री नामदार आदितीताई तटकरे यांचे देखील स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांना महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त मार्गदर्शन केले आणि शुभेच्छा दिल्या तसेच उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी देखील उपस्थित भीम अनुयायी यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. यादिनी विशेष सत्कार म्हणून तळा तालुक्यातील भानंग गावच्या धम्म भगिनी सुशिलाताई भीमराव पवार यांनी जानेवारी २०२६ मध्ये धम्म प्रचार आणि प्रसाराचे कार्य अधिक गतीमान करण्याच्या दृष्टीने श्रामनेरी दीक्षा घेतल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते प्रा डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी अर्थशास्त्राचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक महेंद्र पाटेकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी विविध प्रात्यक्षिक उपस्थितांसमोर सादर केली. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष धर्मा तुकाराम लोखंडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात उपस्थितांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

आभार मानत व कार्यक्रमाचा समारोप धनराज गायकवाड यांनी केला. या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे माजी अध्यक्ष विजय जाधव, सेवा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हरिश्चंद्र माळी, आणि वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष सुदाम लोखंडे आणि तिन्ही संस्थेची स्थानिक व मुंबई येथील संपूर्ण कार्यकारणी, सभासद बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गायकवाड यांनी केले.

# वरळी बीडीडी चाळीत तणाव; मध्यस्थीने परिस्थिती नियंत्रणात

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वरळीतील बीडीडी चाळ परिसरात मंगळवारी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. जयंतीनिमित्त डीजे वाजवण्यास पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

नागरिकांनी निषेध नोंदवत परिसरातील लाईट बंद करून आंदोलन केले. "इतर सर्व जयंती साजऱ्या होतात, मात्र आमची जयंती साजरी करू दिली जात नाही," असा आरोप स्थानिकांनी पोलिसांवर केला. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून मोठा फौजफाटा तैनात केला होता.परिस्थिती अधिक चिघळू नये यासाठी पोलिस अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधींमध्ये चर्चा झाली. दोन्ही बाजूंनी संयम राखत संवाद साधल्यामुळे अखेर तणाव निवळला आणि परिसरात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली.या घटनेमुळे काही काळ परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र वेळेवर केलेल्या मध्यस्थीमुळे संभाव्य वाद टळला.

# संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : परमपूज्य बोधिसत्व, क्रांतिसूर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूरातील संविधान चौक येथे विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) नागपूर शहराध्यक्ष शेखर पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा कार्यक्रम नागपूर शहराध्यक्ष दुनेश्वरजी पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमास माजी आमदार प्रकाश गजभिये, प्रवीण कुंटे पाटील, महिला अध्यक्षा प्रिया फुके, रुद्र धाकडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष शरदचंद्र पवार, नागेश वानखेडे, अनमोल आमला आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा जागर ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.



खांदा कॉलनीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 संयुक्त जयंती महोत्सवात खांदा कॉलनीत नगरसेवक एकनाथ गायकवाड नगरसेवक दशरथ म्हात्रे माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील संयुक्त जयंती महोत्सवाचे अध्यक्ष संजय कांबळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतांना

( दैनिक युवक आधार )

# एसआईआर प्रक्रिया पारदर्शीपणे राबवा

## काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीची नेवासा तहसीलदारांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी लखन वाल्हेकर** : मतदार दुरुस्तीसाठी राबवलेली एसआईआर प्रक्रिया पारदर्शी पार पडण्याची मागणी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने नेवासा तहसीलदार यांच्याकडे केली.



देशभरात नुकतीच मतदार यादी दुरुस्तीसाठी एसआईआर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. परंतु ही प्रक्रिया संशयास्पद असल्याचे दिसत असून जाणूनबुजून काही समाजाचे नावे मतदार यादीतून काढून टाकण्याचा घाट घातल्याचे दिसून येत असून याबाबत काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीने आक्षेप नोंदवला आहे. नेवासा तालुक्यात ही प्रकिया पारदर्शी राबावी यासाठी आज तहसीलदार व निवडणूक अधिकारी यांची भेट घेऊन मतदार यादी दुरुस्ती संदर्भात काही मागण्या करण्यात आल्या. मागण्यात प्रामुख्याने मतदार यादीतून ज्या व्यक्तीची नावे वगळणार त्याचे आधार, मतदान कार्ड व इतर रहिवासी पुराव्याची योग्य पडताळणी करावी,वगळलेल्या व्यक्तीस नाव वगळल्याचे स्पष्ट व लेखी कारण देण्यात यावे.ते व्हाट्सपद्वारे देता कामा नये,वगळलेल्या नावाची त्या गावातील ग्रामपंचायतला देण्यात यावी. वगळलेल्या नावाचा विषय हा ग्रामसभेत उपस्थित करण्यात यावा.सद्य स्थितीतील मतदार यादीत अनेक व्यक्तीची नावे दुबार, तीन वेळा आली आहेत ती दुरुस्ती करण्यात येऊन त्या व्यक्तीचे नाव एकदाच आले पाहिजे.सद्य मतदार यादीत घर क्रमांक चुकीचे टाकण्यात आले आहे ते दुरुस्ती करण्यात यावे व घराचा खरा नंबर यादीत टाकण्यात यावा. कारण एकाच घरात दहा ते बारा हजार मतदान दाखविण्यात आले आहे.मतदार यादीत मतदाराचे नाव पूर्ण असावे, तसेच त्याच्या वडिलांचे नाव देखील पूर्ण असावे, नविन मतदार यादीत समाविष्ट करताना गावात कोणीही वंचित राहणार नाही याची दाखल घ्यावी तसेच नवीन मतदाराची पूर्ण पुराव्याची शहानिशा करावी. अनेक व्यक्तीची नावे राहत्या गावाऐवजी इतर गावात गेली ती दुरुस्ती करण्यात यावी.

अशा सुधारणा या एसआईआर प्रक्रिया राबविताना व मतदार यादी सुधारणा करण्याबाबत सुचवील्या आहेत. यावेळी वंचितचे पोपटराव सरोदे यांनी एसआईआर प्रक्रियेत कुठल्याही प्रकारची चूक झाल्यास निवडणूक अधीकाऱ्यास जबाबदार धरण्यात येऊन याविरोधातकठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट केले. काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी एसआईआर प्रक्रिया ही लोकशाहीचा पाया समजल्या जाणाऱ्या मतदाराच्या अधिकाराची प्रक्रिया आहे. त्यामुळे जनतेने याबाबत अंत्यन्त सजग राहणे गरजेचे आहे.

एसआईआर पारदर्शी पार पाडण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे स्पष्ट केले. निवेदनावेळी काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल,वंचितचे उपाध्यक्ष संदीप क्षीरसागर, महासचिव गणपत मोरे, युवा नेते हरीश चक्रनारायण आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# रुस्तमपूरात भीमजयंती उत्साहात: न्यू पंचशील बौद्ध मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे, तालुका प्रतिनिधी, दर्यापूर** : विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त न्यू पंचशील बौद्ध मंडळ, रुस्तमपूर येथे आज सकाळी प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मा. सौ. सुषमाताई खडे होत्या. यावेळी उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर, ग्रामपंचायत सदस्य राजुभाऊ चव्हाण, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रमोद जाधव सर, सहाय्यक शिक्षिका श्रीमती योगिता आवारे मॅडम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविभाऊ तायडे, अंगणवाडी सेविका श्रीमती शशिकला तायडे यांच्यासह पंचशील बौद्ध मंडळाचे पदाधिकारी व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी 'जय भीम' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.



सरपंच सौ. सुषमाताई खडे म्हणाल्या, "बाबासाहेबांनी स्त्रियांना शिक्षणाचा आणि सन्मानाचा हक्क मिळवून दिला. आज मी सरपंच म्हणून तुमच्यासमोर उभी आहे, ते फक्त संविधानामुळे. गावातील प्रत्येक मुलीने शिकले पाहिजे, हेच बाबासाहेबांचे स्वप्न आपण पूर्ण करूया."

उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर यांनी सांगितले, "पंचशील मंडळाच्या माध्यमातून गावात प्रबोधनाचे काम सुरू आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश घरोघरी पोहोचवू." मुख्याध्यापक प्रमोद जाधव सर यांनी, "शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला बाबासाहेबांचा संघर्ष पाठ असला पाहिजे. कारण पुस्तक हेच आपले खरे शस्त्र आहे," असे प्रतिपादन केले.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविभाऊ तायडे यांनी मंडळाच्या सामाजिक कार्याचा आढावा दिला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. अजय बाळकृष्ण खडे, सदस्य नवयुवक पंचशील मंडळ रुस्तमपूर तथा शिक्षणतज्ञ जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, रुस्तमपूर, यांनी खुमासदार शैलीत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक शिक्षिका योगिता आवारे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सदस्य राजुभाऊ चव्हाण यांनी मानले.

बौद्ध उपासक-उपासिकांनी सामूहिक त्रिशरण-पंचशील ग्रहण केले. अंगणवाडी सेविका शशिकला तायडे यांनी उपस्थित मुलांना खाऊ वाटप केले. सामाजिक ऐक्य आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे रुस्तमपूर गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. न्यू पंचशील बौद्ध मंडळ, रुस्तमपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना सरपंच सौ. सुषमाताई खडे, उपसरपंच गणेशभाऊ लाजूरकर, सूत्रसंचालक आयु. अजय बाळकृष्ण खडे व इतर मान्यवर उपस्थित होते

# वनसगावात डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वनसगाव येथील पंचशील बुद्ध विहारात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध तसेच इतर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी बोलताना भुजबळ यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर हे सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक असून त्यांनी दिलेला "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात पांडुरंग निरभवने यांनी बुद्धवंदना घेतली. माणुसकी सामाजिक फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती सागर निकाळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेश बनकर यांनी केले.

सायंकाळी भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिमगर्जना मित्रमंडळाने पुढाकार घेतला. या वेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वर्धा जिल्हा, गरमसूर गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गरमसूर गावात मोठ्या उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गावातील नागरिकांनी एकत्र येत अभिवादन करून समाजात एकतेचा संदेश दिला.

सकाळी ग्रामपंचायत परिसरात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर गावातून भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. या फेरीत युवक, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर प्रकाश टाकत त्यांच्या कार्याचे महत्त्व सांगितले. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांनी भाषणे, गीते आणि नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.गरमसूर गावकऱ्यांनी एकत्र येऊन साजरी केलेली ही जयंती समाजातील ऐक्य व एकोप्याचे प्रतीक ठरली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा अंथुर्णे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक जाणीवेने संपन्न झालेल्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदीप साबळे व अध्यक्षा काजल साबळे यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.कार्यक्रमास जिल्हा परिषद



सदस्या निर्मलाताई मिसाळ,पंचायत समिती सदस्य श्रीराज भैया भरणे,छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगरचे संचालक व छत्रपती हायस्कूल अंथुर्णेचे मुख्याध्यापक तानाजीराव शिंदे,सागर बाबा मिसाळ अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग पुणे जिल्हा, सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मस्के मॅडम,केंद्रप्रमुख चुडामन धापटे,ग्रामसेवक दिपक भोसले,ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र ढावरे तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद,व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.मान्यवरांनी डॉ.आंबेडकरांच्या विचारांची सांगड घालत पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. "झाडे लावा,झाडे जगवा" हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

संविधान साबळे व अभिज्ञा साबळे या विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषण करून उपस्थितांची दाद मिळवली. त्यांच्या विचारांमधून सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलता स्पष्टपणे जाणवली.वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. ग्रामीण भागात शाळांच्या माध्यमातून सामाजिक व पर्यावरणीय जाणीव निर्माण होणे ही सकारात्मक बाब आहे. विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना विकसित होत असून समाजात जागरूकता निर्माण होत आहे.अशा विधायक उपक्रमांना सातत्याने चालना देणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ गरज नसून ती काळाची हाक आहे, याची जाणीव या कार्यक्रमातून प्रकर्षाने झाली.कार्यक्रमास अभिजीत साबळे, सागर सोनवणे, मुस्तफा शेख, स्वप्निल भोसले, आदित्य साबळे, बापू गायकवाड, अंकुश साबळे, सोमनाथ देवकुळे, नितीन खरात, शब्बीर शेख,पिंटू गलांडे इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# आरटीई प्रवेशाच्या कागदपत्र पडताळणीसाठी पालकांची गर्दी, पनवेल पंचायत समितीमध्ये गडबड, गोंधळ

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागात आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्या अंतर्गत कागद पडताळणी सुरू आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात पालकांनी गर्दी केल्याने या ठिकाणी गडबड गोंधळ पाहावयास मिळाला.

सोमवारपासून पनवेल पंचायत समितीतील शिक्षण विभागाच्या कार्यालयात आरटीईच्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी पालकांची झुंबड उडाली. वाढती गर्दी लक्षात घेता शिक्षण विभागाने 200



टोकनचे वाटप केले. मात्र यावेळी 700 पेक्षा अधिक पालक आल्याने मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. या ठिकाणी कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी सुरू असून वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. आपल्या पाल्याचा आरटीई अंतर्गत प्रवेश व्हावा आणि त्याच्या कागदपत्रांची पडताळणी लवकर व्हावी यासाठी प्रत्येक पालक या ठिकाणी गर्दी करत आहे. बुधवारी या ठिकाणी पोलिस बंदोबस्त देखील नेमण्यात आला होता. गेल्या तीन दिवसांपासून अनेक पालक आपल्या पाल्याच्या आरटीई प्रवेशाच्या डॉक्युमेंट तपासणीसाठी पंचायत समितीत तळ ठोकून आहेत. तहान-भूक विसरून त्या ठिकाणी ते येत आहेत. अनेकांना टोकन मिळत नसल्याने त्यांचा हिरमोड होताना दिसत आहे.

त्यामुळे पंचायत समितीत गर्दी होत आहे. अनेकांना कामावरून सुट्टी घेऊन रांगेत उभे राहावे लागत आहे. पालकांनी घाई न करता आपली कागदपत्र तपासणी करावी असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# श्रीवर्धनमध्ये वाढत्या चोरींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण ; पोलिसांकडे ठोस कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहरात गेल्या काही महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. जीवन रोड, पोतदार चाळ, विठ्ठल आळी आदी भागांत वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे जनतेत प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक व नगरपरिषद उपाध्यक्ष श्री. अनंत लक्ष्मण गुरव यांनी श्रीवर्धन पोलिस ठाण्याचे पोलिस



निरीक्षक यांना निवेदन देत तात्काळ आणि ठोस कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, चोरीच्या घटनांनंतरही पोलिस प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी, शहरातील अनेक भागांत नागरिक स्वतःहून रात्री गस्त घालत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

यासंदर्भात खासदार सुनील तटकरे यांनीही आढावा बैठकीत पोलिस प्रशासनाला जाब विचारला होता. तसेच महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांवर त्वरित आळा घालण्यासाठी संशयितांवर कठोर कारवाई करावी, नागरिकांना विश्वासात घेऊन बैठक आयोजित करावी आणि शहरातील भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांमध्ये वाढत्या असंतोषामुळे प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# विदर्भाचा 'हॉटस्पॉट' अकोला जिल्ह्यात उष्णतेचा कहर !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : संपूर्ण महाराष्ट्र सध्या उन्हाच्या झळांनी होरपळत असून, अकोल्याने मात्र उष्णतेने कहर केला आहे.

निसर्गाचा हा प्रकोप आणि सूर्याची आग ओकणारी किरणे यामुळे अकोलेकर अक्षरशः 'भाजून' निघत आहेत.

अकोल्यात भीषण उष्णतेची लाट असून पारा ४३°C च्या पार गेला आहे, ज्यामुळे ते देशातील सर्वात उष्ण शहरांपैकी एक ठरले आहे . कडक उन्हामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, महाराष्ट्रातील पहिला उष्माघाताचा बळी अकोल्यात गेल्याचे वृत्त आहे . पुढील ७२ तास अधिक धोकादायक असून, तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे

गेल्या २४ तासांत अकोल्याचे तापमान ४३ ते ४४ च्या दरम्यान नोंदवले गेले आहे. जागतिक हवामान बदल आणि स्थानिक भौगोलिक परिस्थितीमुळे अकोल्याने अनेक शहरांनाही मागे टाकले आहे.

उष्णतेचा जनजीवनावर मोठा परिणाम होत असून, दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्ते ओस पडत असून शहरात जणू 'अघोषित संचारबंदी' लागू



झाल्यासारखे चित्र आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका वाढला असून प्रशासनाने नागरिकांना महत्त्वाच्या कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.

"अकोल्याचे तापमान दरवर्षी वाढत आहे, अकोल्याचे जगातील उष्ण शहराच्या यादीत नाव येणे ही चिंतेची बाब आहे. या काळात नागरिकांनी पुरेसे पाणी प्यावे आणि स्वतःची काळजी घ्यावी." नागरिकांनी पाण्याचा वापर वाढवावा तहान नसली तरी पाणी पित राहावे ,

वरचेवर लिंबू सरबत, ताक आणि ओआरएस (ORS) चा वापर करावा आणि काम नसताना दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, हलक्या रंगाचे आणि सुती कपडे वापरावे .अश्या सूचना प्रशासनातर्फे नागरिकांना देण्यात आल्या आहेत.

# आडवी बाटली'साठी प्रभागातील महिला सज्ज ; जनजागृती रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद ; आज होणार निर्णायक मतदान

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशेमहागाव :(यवतमाळ )** : हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रभाग क्रमांक १ मधील तेलचित्रा समोर देशी दारूचे दुकान सुरू करण्यात आल्याने स्थानिक महिलांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. रस्त्यावरून जाणाऱ्यांचे शाळकरी विद्यार्थ्यांचे आणि लगतील व प्रभागातील शेकडो कुटुंबाचे समाजाच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्या या व्यसन दारू दुकानाचे महिलांनी लोकशाही मार्गाने लढा उभारला आहे. महिलांच्या या आंदोलनाची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेत 'आडवी बाटली' करण्यासाठी मतदान घेण्याचा निर्णय घेतला असून आज या ऐतिहासिक निर्णयासाठी मतदान पार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर महिलांनी परिसरात भव्य जनजागृती रॅली काढून घराघरात जाऊन मतपत्रिकेची डमी प्रत दाखवत नागरिकांना 'आडवी



बाटली' करण्याचे आवाहन केले. या उपक्रमाला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.

सावित्रीबाई फुले कन्याशाळा येथे सकाळपासून मतदान प्रक्रिया सुरू होणार असून यामध्ये दारू दुकान बंद करण्यासाठी आडवी बाटली आणि सुरु ठेवण्यासाठी 'उभी बाटली' अशी दोन चिन्हे ठेवण्यात आली आहेत. या ऐतिहासिक निर्णयासाठी तब्बल १४६ महिला आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजता मतमोजणी होणार असून या निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


दारूबंदी संघर्ष समितीच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या या जनजागृती रॅलीत नगराध्यक्ष रंजना आडे, जयश्री संजय नरवाडे, नगरसेवक रामाराव पाटील नरवाडे, सुरेश पाटील नरवाडे, दीपक आडे, प्रमोद भरवाडे, शैलेश कोपरकर, छाया नरवाडे, अनिता गावंडे, सविता रुणवाल, सुलोचना राठोड, संजीवनी भेंडे, पंजाबराव राठोड, बळीराम राठोड, दिनेश भेंडे, रफिक सुरैय्या, बळीराम राठोड ,अनिल कोलते, अविनाश किल्लोर,पत्रकार गजानन वाघमारे, संजय भगत , गणेश भोयर,संजय पाटे, संजय सुरोशे, निलेश नरवाडे, रियाज पारेख यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व नागरिक सहभागी झाले होते.महिलांच्या या ठाम आणि संघटित भूमिकेमुळे दारूबंदीच्या दिशेने महागावात एक नवे सामाजिक पर्व सुरू होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# मालेगाव येथील मंगेश अन्नपूर्णे यांची सामाजिक न्याय विभागात नियुक्ती ; हलाखीच्या परिस्थितीतून यश मिळवत मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर /अरविंद पांचाळ दाभडकर** : अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील मंगेश आणि पूर्ण यांच्या घरची परिस्थिती हलकीची असून सुद्धा त्याने यशाचे शिखर गाठले असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही. नांदेड येथील सामाजिक न्याय विभागात मंगेश आनंदराव अन्नपूर्णे यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या निवडीमुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी



श्री.राहुल कर्डीले तसेच समाज कल्याण आयुक्त श्री.शिवानंद मिनगिरे यांच्या हस्ते मंगेश अन्नपूर्णे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.या नियुक्तीबद्दल त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले असून सामाजिक क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

मंगेश अन्नपूर्णे यांच्या निवडीबद्दल मराठी पत्रकार संघाच्या व शाळेच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले.यावेळी अर्धापूर तालुका मराठी पत्रकार संघाचे सचिव संजय पाटील इंगोले,मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष, गंगाधर सोनटक्के,प्रा. राजेसाहेब शेख ,प्रा.फाजगे,रामेश्वर पाटील, अंकुश पोळ,राजू गजभारे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मंगेश अन्नपूर्णे हे मालेगाव येथील रहिवासी असून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी हे यश संपादन केले आहे.त्यांच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी रोजंदारी मजुरी करत अभ्यास सुरू ठेवला.कठोर परिश्रम,चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी सामाजिक न्याय विभागात नोकरी मिळवून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.सामाजिक न्याय विभागात निवड झाल्यामुळे समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याची संधी मिळाल्याचे अन्नपूर्णे यांनी सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल मित्रपरिवार,ग्रामस्थ व शुभेच्छुकांकडून सतत शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस सर्वत्र शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# रायते येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 जयंती कुठेही गाल बोटं न लागता थाटामाटात जयंत साजरी सर्व गावकरी ग्रामस्थ उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर/रशीद शेख** : रायते गावं हे एक ठाणे जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात येथेल तरुण पिढी व गावकरी ग्रामस्थांनी एकत्र येऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली आहे कुठेहि गालबोट न लागता गोवेली पोलीस चौकीचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते बाळ गोपाळ महिला मंडळ जेष्ठ नागरिक आजी माजी यांनी सर्वांनीच एकत्र येऊन धुम धडाक्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केली रायते माजी ग्रामपंचायत सदस्य मिलिंद चंदाने यांच्या निवासस्थानी जाऊन पत्रकार नारायण सुरोशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ठाणे जिल्हा उप



अध्यक्ष राम सुरोशी कल्याण तालुका काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अमोल सुरोशी व सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत तारमळे यांनी संविधान देऊन भेट दिली आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# पालोद येथे भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मंगळवार, १४ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात, सामाजिक सलोख्यात आणि प्रशासकीय शिस्तीत साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित अभिवादन कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर यांनी उपस्थित राहून महामानवांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्प अर्पण करून आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी परिसरातील सर्वधर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सायंकाळी गावातून भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली . सार्वजनिक जयंती उत्सव समितीने आयोजित केलेला हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. विशेष म्हणजे, प्रशासकीय नियमांचे, आवाजाच्या मर्यादेचे आणि वेळेचे काटेकोर पालन करून ही मिरवणूक शांततेत संपन्न झाली.

या जयंती सोहळ्यामुळे संपूर्ण पालोद परिसरात उत्साहाचे आणि वैचारिक चैतन्याचे वातावरण दिसून आले. प्रशासकीय व न्यायालयीन नियमावलीचे पालन करून हा उत्सव साजरा केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# खालापुर मधे लाखो रुपयांची फसवणुक करणारी टोळी एका महिलेसह इतरांना बेड्या घालून अटक, काहीजण फरारी

**दैनिक युवक आधार**

**खालापुर:- संतोष शेवाळे :** पैशाच्या गुंतवणुकीवर दुप्पट, तिप्पट व्याज देण्याचे, बक्षिसांचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची चर्चा गेली सहा महिने चौक, खालापूर परिसरात जोरदार होती, आज प्रत्यक्ष एका महिलेसह तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता आहे.

चौक व खालापूर येथे सुसज्ज कार्यालय सुरू करून परिसरातील मोठे व्यावसायिक,नोकरदार वर्ग ते सर्वसामान्य यांच्या भेटी घेऊन त्यांना आपल्या सावी कन्सलटन व अन्य दोन कंपनीत गुंतवणूक करण्यासाठी प्रयत्न करत असत, चांगले व्याज, थोड्याच अवधीत दुप्पट रक्कम याची अनेक गुंतवणूकदार यांना भूल पडलीं.यावेळी कार्यालयाच्या माध्यमातून गुंतवणूकदार यांना गिफ्ट,चांगली वागणूक देऊन त्यांना आकर्षित केले जायचे,त्यामुळे गुंतवणूकदार हे ओढले गेले, विशेष



म्हणजे येथील स्थानिक लोकच हे काम करून स्थानिक लोकांची फसवणूक करीत होते,कंपनीत काम करणारे हे स्थानिक आहेत, त्यांच्याच भरवशावर स्थानिक लोकांनी आपली गुंतवणूक केली, अगदी सुरुवातीला गिफ्ट देणे, चांगली वागणूक देणे बरोबर परतावा देखील देण्यात येत होता,कालांतराने गिफ्ट, आमिष, चांगली वागणूक ही कमी झाली, व्याज न देणे,दिलेला शब्द पूर्ण न करणे या गोष्टी सुरू झाल्याने गुंतवणूकदार यांना संशय वाढू लागला. दरम्यान खालापूर येथील प्रशस्त कार्यालयात बसून कामकाज करणारे क्वचित दिसत असत. कार्यालय सतत बंद दिसत असल्याने गुंतवणूकदार यांनी कुठे विचारणा करायची?त्यामुळे कंपनीच्या स्थानिक पदाधिकारी यांच्याशी वाद सुरू झाले, पण कुणीही गुंतवणूकदार पोलिसात तक्रार देण्यास तयार नव्हते.हळूहळू ही गुंतवणूक मोठी असून अनेकजण यात फसले आहेत,याची परिसरातील लोकांना माहिती मिळू लागल्यावर हे गुंतवणूकदार एकत्र येऊन त्यातील एकाने गुन्हा खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४५/२०२६ नुसार दाखल केल्यावर आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले,भारतीय न्याय संहिता ३१६(२)३१६(५)३१८(३)३(५)

महाराष्ट्र ठेवीदार अधिनियम(वित्तीय संस्था यामधील हित संबंधाचे कलम १९९९ चे ३,४बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंध अधिनियम २०१९ चे कलम ३,४,५,२१,२२,२३ प्रमाणे श्वेता प्रभू, पंकज शहा, देवेंद्र सरदार या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पुढील तपास उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष मोरे करीत आहेत. आपल्या कष्टाने, घाम गाळून कमविलेले पैसे याची अशी लालचेपोटी गुंतवणूक करणे निषेधार्थ आहे, अशी चर्चा सुरू आहे, या गुंतवणुकीत प्रतिष्ठित लोक असल्याची माहिती समोर येत असून, योग्य वेळी ती नावे समोर येतील.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या औचित्याने राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६ जाहीर

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : अर्धापूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना सहभागाची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या निबंध स्पर्धेचा विषय “भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य” असा असून, समाजातील महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकण्याचे आवाहन करण्यात आले आहे.स्पर्धा दोन गटांमध्ये विभागण्यात आली आहे. गट १ मध्ये ITI, डिप्लोमा, बायफोकल व MCVC विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांच्यासाठी ५०० ते ८०० शब्दांची मर्यादा ठेवण्यात आली आहे. तर गट २ हा पुरुष व महिला खुला




गट असून या गटासाठी ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

स्पर्धेची अंतिम तारीख १४ते २०एप्रिल २०२६ अशी असून, इच्छुक स्पर्धकांनी आपला निबंध PDF स्वरूपात दिलेल्या लिंकवर अपलोड करणे बंधनकारक आहे. निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित असू शकतो; मात्र अंतिम सादरीकरण PDF मध्येच स्वीकारले जाणार आहे. लिंक https://forms.gle/RcFPh-cUgY8X4P2NT8

स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी ₹ ३१,०००, द्वितीय ₹ २१,०००, व तृतीय ₹ ११,००० ,अशी आकर्षक पारितोषिके, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देण्यात येणार आहेत. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल.निबंध मराठी भाषेत व मूळ (Original) असणे आवश्यक असून, कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल, अशी स्पष्ट सूचना आयोजकांनी दिली आहे. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा तसेच मजकूर शिष्ट व सुसंस्कृत असावा. स्पर्धकांनी निबंध सादर करताना पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक, शिक्षण संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता ही माहिती अनिवार्यपणे भरावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# स्वर्गीय झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आंबेडकरजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : स्थानिक स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था अंतर्गत संचालित सतनाम नशा मुक्ती केंद्र, गोंदिया येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. लोकेश चिर्वतकर , संस्थेचे उपाध्यक्ष सचिन बन्सोड सर, सचिव टी.वाय. चिर्वतकर, सदस्य सौ.सुनिता सव्वालाखे मॅडम ,इतर कर्मचारी वृंद आणि केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ .बाबासाहेब आंबेडकर




यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी ‘जय भीम’ च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

मान्यवरांचे मार्गदर्शन कार्यक्रमात बोलतानी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. साहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, समाज सुधारक ,उच्च विद्याविभूषित व स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री होते. न्याय, स्वतंत्रता आणि समते साठी त्यांनी आपले आयुष्य अर्पण करणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

# सांगवी पाटण येथे संत गोरोबाकाका यांच्या ७०९व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य प्रवचन व महाप्रसाद

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे :** आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे गोरोबा काका यांची ७०९ वी पुण्यतिथी व गोरोबाकाका मंदिर वर्धापन दिनानिमित्त सुदर्शन गड संस्थानचे महंत भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांचे प्रवचन झाले.

यावेळी समीर शेख व विजय मरकड यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याला माननीय पदाधिकारी म्हणून मा.पंचायत समिती सदस्य



रावसाहेब लोखंडे, सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, माऊली भोसले, बाबासाहेब भोसले, लक्ष्मण भोसले, विजय मरकड , राघव खिलारे,राजेंद्र टाक, समाजसेवक समीर शेख यांच्यासह राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, वारकरी संप्रदायाचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष भाविक उपस्थित होते.आलेल्या सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमांचे आयोजन शिवाजीराव बोराडे व त्यांच्या सर्व सहकारी बोराडे वस्ती यांनी केले होते.

# नेरळ, ममदापुर येथे वैद्यकीय उपचार फक्त ३० रुपयांत!!

**दैनिक युवक आधार,**

**ता. कर्जत / वैभव गायकवाड** : कर्जत तालुक्यामधील नेरळ येथे आता वैद्यकीय उपचार हे फक्त ३० रुपयांमध्ये मिळणार आहेत."ह्यूमन सपोर्ट फॉउंडेशन" ह्या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. शमशूद्दीन शेख यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या या वैद्यकीय सेवेमुळे सर्व सामान्यांना याचा लाभ होणार आहे. अलीकडच्या काळात वैद्यकीय क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रगती घडली तसेच सर्व-सामान्यांना न परवडणारे दर देखील त्याच प्रगतीनं वाढले. अशा परिस्थिती मध्ये लोकांची भावना लक्षात घेता त्यांना माफक दारात वैद्यकीय सेवा, औषधे, रक्ताच्या चाचण्या तसेच तज्ञ डॉक्टरांचे सल्ले व उपचार देण्याकरिता हा उपक्रम हाती घेण्याचा चंग शेख साहेबांनी बांधला. ११ एप्रिल २०२६ रोजी त्यांनी ह्या उपचार केंद्राचे आपल्या आईच्या हस्ते त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लोकार्पण केले. कोणताही मोठा गाजवाजा न करता कोणत्याही मोठ्या नेत्याला किंवा सेलिब्रेटी ला न बोलावता आपल्या आईच्या हस्ते उपचार केंद्राचे उद्घाटन यशस्वीरित्या पार पाडले या बद्दल त्यांचे विशेष कौतुक सर्वच समाजाकडून केले जात आहे.या उपचार केंद्रात महिलांकरिता विशेष स्त्री रोग तज्ञ डॉक्टर (श्रीमती. स्नेहल कुंभार) सुद्धा उपलब्ध असणार आहेत. सकाळी १० ते दुपारी २ ह्या वेळेत स्त्री रोग तज्ञ सेवेकरीता उपलब्ध




असणार आहेत. तसेच सायंकाळी सर्वसाधारण आजारावरील डॉक्टर (श्री. श्रेयस कुंभार) उपलब्ध असणार आहेत.

सर्वासामान्य जनतेच्या हितासाठी डॉ. शमशूद्दीन शेख ह्यांनी हा जो उपक्रम राबवीला आहे त्याचे कौतुक करावे तितके कमीच आहे. प्रायव्हेट डॉक्टर आणि हॉस्पिटल च्या अगडबंब खर्चामुळे सामान्य व गरीब लोकांसाठी हे उपचार केंद्र वरदान ठरणार आहे. नेरळ मधील ममदापुर हा ग्रामीण भाग असून येथे ही सेवा सर्वांकरिता वरदान ठरणार आहे.अगदी ३० रुपयांमध्ये वैद्यकीय उपचार व इतर सर्वत्र ठिकाणी आकारल्या जाणाऱ्या रक्त चाचण्या ह्या येथे ५०% इतक्या माफक दरात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच इतर औषधे हे देखील ४० ते ६०% कमी दरात ह्या वैद्यकीय उपचार केंद्रामध्ये मिळणार आहेत.

# मनोहर बोभाटे यांना ‘डॉ . बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार’ ; महात्मा ज्योतिबा फुले जयंतीदिनी सन्मानामुळे दुहेरी आनंद

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारितेतून जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे निर्भीड पत्रकार मनोहर बोभाटे यांना प्रतिष्ठेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार उत्साहपूर्ण वातावरणात प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे हा सन्मान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करणारा असून,तोच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीदिनी मिळाल्याने सोहळ्याला ऐतिहासिक आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

मनोहर बोभाटे यांनी ग्रामीण भागातील मूलभूत समस्या, शेतकरी अडचणी,प्रशासनातील त्रुटी आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने लेखन करत सामान्य जनतेचा आवाज बुलंद केला आहे.त्यांच्या वस्तुनिष्ठ,निर्भीड आणि समाजाभिमुख पत्रकारितेमुळे अनेक प्रश्न प्रशासनाच्या दारात पोहोचले आणि त्यावर



कार्यवाहीही झाली. याच कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला असून,यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी बोभाटे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.दरम्यान, सन्मान जाहीर होताच मनोहर बोभाटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत असून, त्यांच्या कार्याचा अभिमान व्यक्त केला जात आहे. या सन्मानामुळे राळेगाव तालुक्याच्या नावलौकिकात भर पडली असून, तरुण पत्रकारांसाठीही मनोहर बोभाटे हे प्रेरणास्थान ठरत आहेत. भविष्यातही त्यांनी समाजहिताची भूमिका अधिक प्रभावीपणे निभवावी, अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# सुरगाणा महाविद्यालयात डॉ . आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे राज्यशास्त्र विभागाच्या मार्फत प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या सहसंचालक उच्च शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वकृत्व १८ तास अभियानाअंतर्गत ता.१३ रोजी वकृत्व स्पर्धा, १८ तास अभ्यास, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा आयोजित



करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे पहिल्या सत्रात वकृत्व स्पर्धा घेण्यात आली होती त्यात २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तर निबंध स्पर्धेत ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. दुसऱ्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित खंडाचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, प्रा. सुरेश भोये, प्रा.बी.डी.धुम, प्रा. कृष्णा गांगोडे,प्रा.भगवान महाले, डॉ.सविता सिरसाठ, डॉ.माधुरी गावित,प्रा. पुष्पा महाले, वर्षा जोशी, प्रमिला धुम ओमकार धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आमच्या साठी "प्रेरणा दिवस "

## या दिवसाला ज्येष्ठांचा सन्मान केला पाहिजे – मधुसूदन कोवे गुरुजी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** भारतीय राज्यघटना चे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन भारतीय लोकशाही व्यवस्था मध्ये केले जाते असेच आयोजन ग्राम स्वराज्य महामंच यांनी जयंती निमित्त समाजव्यवस्थेत जेष्ठ नागरिक यांच्या कार्याचा अनुभव म्हणून " प्रेरणा दिन " साजरा करण्यासाठी मा मधुसूदन कोवे गुरुजी, अध्यक्ष ग्राम स्वराज्य महामंच यांनी पुढाकार घेतला होता* *आपल्या आयुष्यातील अनुभव युवा तरुणांना मिळावे यासाठी " प्रेरणा दिन " कार्यक्रम मध्ये सहभागी अध्यक्ष म्हणून मा गोविंद चव्हाण, सेवा निवृत्त अधिकारी हे होते तर सत्कार मुर्ती मा कृष्णा जी भोंगाडे, जिल्हा अध्यक्ष विदर्भ राज्य आंदोलन समीती यवतमाळ हे होते प्रमुख अतिथी म्हणून मा डॉ विलास कनाके विज तांत्रिक संघटना महाराष्ट्र राज्य हे होते* *१४ एप्रिल या दिनाचे औचित्य साधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त " प्रेरणा दिन " म्हणून साजरा करत असताना मा मधुसूदन कोवे गुरुजी यांनी आपल्या प्रास्ताविकातून अनेक विषय मांडले १) थोर पुरुषांची जयंती/पुण्यतिथी का ? साजरी करावी २) जेष्ठ नागरिक/ सामाजिक कार्यकर्ते यांच्या कार्याचा गुणगौरव कधी करायचा ३) सामाजिक बांधिलकी/ राष्ट्रीय एकात्मता समाज निर्माण होण्यासाठी असे प्रेरणादायी कार्यक्रम समाजात घेतले



पाहिजे असे प्रास्ताविक विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा कृष्णा जी भोंगाडे यांचा जन्मदिन होता ती आयुष्याच्या ६५ ची सुरुवात होती म्हणून या कार्यक्रमात ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला आणि साध्या सोप्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला* *वाढदिवसाच्या निमित्ताने अनेकांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या काही मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गुणगौरव केला तर ग्राम स्वराज्य महामंच च्या वतीने " शेला दुपट्टा " आणि पुष्प गुच्छ देऊन त्यांचा मानसन्मान करण्यात आला* *डॉ विलास कनाके यांनी कार्यक्रमाचे कौतुक करत असताना खरंच असे कार्यक्रम आम्हाला प्रेरणादायी ठरते म्हणून हा आज मला " प्रेरणा दिन " वाटला आहे जेष्ठ नागरिकांचा अनुभव ऐकून घेणं आज काळाची गरज आहे शायर बेताब यांनी आपली शायरी व्यक्त केली.

# मराठी उद्योजकाचा अमेरिकेच्या हार्वर्डमध्ये झेंडा

## 'तौराल इंडिया' व भरत गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** ॲल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी तौराल इंडिया आणि उद्योगांना ग्रामीण भारताशी जोडू पाहणारे उद्योजक, 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले भरत गीते यांची यशोगाथा जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमधून मांडण्यात आली आहे. या माध्यमातून तौराल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे.

ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन ॲल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित थोनी आलुटेक या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे.

हार्वर्ड बिझनेस स्कुल येथी वरिष्ठ प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, मुंबईतील हॉटेल ताज लँड्स एन्ड येथे मंगळवारी त्यांनी या केस स्टडीचे सादरीकरण केले. भरत गीते व माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह उद्योग, शिक्षण व धोरणात्मक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबतचे विश्लेषण प्रा. व्ही. जी. नारायणन यांनी यामधून मांडले आहे.

प्रा. व्ही. जी. नारायणन म्हणाले, "तौरल इंडियाचा प्रवास उदयोन्मुख बाजारपेठेत उत्पादन क्षमता उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर केंद्रित आहे. जागतिक सहकार्य, उच्च तंत्रज्ञान आणि स्थानिक अंमलबजावणी यांच्या संगमातून सक्षम व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग कसा उभा राहू शकतो, याचे हे उदाहरण आहे. 'तौराल इंडिया'चा प्रवास केवळ उद्योगक्षेत्रापुरता मर्यादित न राहता, नव्या पिढीतील उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यातूनही एखादा तरुण उद्योजक झाला, तर या केस स्टडीचा उद्देश साध्य झाल्याचे समाधान मिळेल."

भरत गीते म्हणाले, "हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये केस स्टडी म्हणून निवड होणे, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आमचा प्रवास मूलभूत तत्त्वांवर आधारित असून, मर्यादांवर मात करत भारतीय उत्पादन जागतिक दर्जाचे बनू शकते, हे सिद्ध करण्याचा आहे. योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि भागीदारीच्या आधारे भारतासाठी आणि जगासाठी उच्च-गुणवत्तेचे, प्रिसिजन-आधारित अभियांत्रिकी उपाय आणि टिकाऊ उत्पादन मूल्य निर्माण करता येते, हा आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे."

२०१६ मध्ये स्थापना झालेली तौराल इंडिया आज चाकण (पुणे) आणि सुपा (अहिल्यानगर) या दोन उत्पादन प्रकल्पांसह ॲल्युमिनियम कास्टिंग उत्पादक म्हणून विकसित झाली आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या दोन गोष्टींशी भावनिक बंध असून, उद्योगांना ग्रामीण भागाकडे घेऊन जाण्याचे ध्येय आहे, असे भरत गीते यांनी यावेळी नमूद केले.

# सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद तालुका प्रतिनिधी /अशोक म्हस्के :** येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल भाऊ म्हस्के होते तर प्रमुख वक्ते म्हणून जाफराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय सतीश जाधव यांची उपस्थिती होती.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे उपप्राचार्य, डॉ.श्याम सर्जे,उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे,मूल्यशिक्षण समिति प्रमुख प्रो.डॉ.संतोष पहारे, प्रो. डॉ.विजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते माननीय सतीश जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की,शिक्षण,समानता आणि



सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार करूनच समाजाची खरी प्रगती साधता येईल तसेच भारतीय राज्यघटनेच्या रूपाने देशात कायद्याचे राज्य असून प्रत्येकाने अधिकार व हक्काबरोबर जबाबदारीचीही जाणीव ठेवली पाहिजे असे सांगितले.तर अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांनी आपल्या सिद्धार्थ महाविद्यालयात दिनांक 2 एप्रिल ते 14 एप्रिल 2026 पर्यंत अखंडपणे व्याख्यानांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेत 14 प्रमुख वक्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी कार्यांवर सखोल प्रकाश टाकून खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन केले असल्याचे सांगितले तसेच येत्या काळात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त ही अशीच व्याख्यानमाला सुरू करण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखविला.

यावेळी सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे विमोचन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अंकाचे संपादक प्रो. डॉ.विजय पाटील यांनी अंक छपाई करताना कोणकोणत्या गोष्टीचा कटाक्षाने विचार केला यांचे विवेचन केले. प्रास्ताविक करताना डॉ.संतोष पहारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे आयोजन, नियोजन,विषयाचे निवड आणि वक्त्यांची निवड याविषयी प्रस्ताविकेत आपले मत मांडले तसेच व्याख्यानमालेचा उद्देशही त्यांनी आपल्या प्रस्ताविकेत सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय पाटील यांनी केले

तर आभार प्रदर्शन प्रा. अमरसिंग धवलिया यांनी मानले या कार्यक्रमास महा-विद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा. अनिल वैद्य महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.

# जेएनपीए येथे 'विवेकी विचारांचा जागर'आणि 'भीम स्वरांचा जयघोष

## एससी- एसटी एम्प्लॉईज असोसिएशन तर्फे महामानवास अभिवादन!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरण आणि एससी-एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रनिर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जेएनपीए टाऊनशिपमधील बहुउद्देशीय सभागृहात हा सोहळा संपन्न झाला.

सकाळी पाहुण्यांच्या आगमनानंतर सामूहिक 'बुद्ध वंदने'ने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. याप्रसंगी प्रबोधन कला मंचाच्या शितल भंडारे यांनी सादर केलेल्या 'विवेकी विचारांचा जागर' या शाहिरी जलशाने उपस्थितांची मने जिंकली.



या कार्यक्रमाला मुख्य महाव्यवस्थापक श्री दीपक सुर्वे वरिष्ठ पोलीस निरीक्षक न्हावा शेवा आणि त्यांच्या पोलीस सहकारी टीमने विशेष उपस्थिती लावून अभिवादन केले. तसेच जेएनपीएचे प्रमुख कामगार विश्वस्त दिनेश पाटील, रवींद्र पाटील, माजी कामगार विश्वस्त कॉ.भूषण पाटील, सुरेश पाटील, प्रमुख मान्यवरांमध्ये व्याख्याते डी. के. सोनवणे साहेब , विधि तज्ञ, रिटायर्ड जज्ज ॲड जयप्रकाश सावंत आणि ॲड प्रो.प्रियांका धोके (मंडलीक )एच ओ डी ,एल एल एम डिपार्टमेंट, डी वाय पाटील लॉ कॉलेज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्र निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये (अध्यक्ष) देवानंद पवार, (सचिव) संदीप कांबळे, (खजिनदार) राजेश सोनकुसरे, (उपाध्यक्ष) सदानंद कोळी, (सहसचिव) विनय पवार, (सहखजिनदार) धनंजय धकीते , (समिती सदस्य) शिशिर बनसोडे, जयश्री पाठारे ,माधुरी मोहकर, प्रमोद पवार ,सुभाष ठाकूर, निवास कांबळे ,अरुण बोकडे ,सुनील जाधव, पंडित चव्हाण ,प्रकाश कांबळे ,अतुल नामे व असोसिएशनचे सर्व सभासद आणि कार्यकर्ते यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले. या सोहळ्यासाठी एससी एसटी एम्प्लॉय असोसिएशनचे सदस्य त्यांचे कुटुंबीय जेएनपीए कर्मचारी आणि न्हावाशेवा पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली.

# मनसेच्या दणक्यानंतर महावितरणला जाग!

**▸ 'तक्रार निवारण मेळाव्याचे नाटक नको, थेट चौकशी करून गुन्हे दाखल करा'**

**▸ सौर कृषी पंप घोटाळ्यावरून कैलास दरेकर यांचा प्रशासनाला इशारा; शेतकऱ्यांना तक्रारी नोंदवण्याचे आवाहन**

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) प्रशासनाला धारेवर धरले होते. या दणक्यानंतर अखेर महावितरणला जाग आली असून, त्यांनी गुरुवारपासून (१६ एप्रिल) शेतकऱ्यांसाठी 'तक्रार निवारण मेळावे' आयोजित केले आहेत. मात्र, मनसेने या मेळाव्यांच्या हेतूवरच शंका उपस्थित केली असून, हे कॅम्प म्हणजे झालेले गैरप्रकार दडपण्याचा डाव तर नाही ना, असा सवाल मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी विचारला आहे.

कैलास दरेकर यांनी १ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन सौर कृषी पंप योजनेतील भ्रष्टाचाराची पोलखोल केली होती. यात प्रामुख्याने ऑनलाईन सिस्टीममध्ये छेडछाड करून पात्र शेतकऱ्यांची नावे बेकायदेशीरपणे हटवणे, आर्थिक तडजोड करून बोगस आणि धनदांडग्या व्यक्तींना पंपांचे वाटप करणे, ७/१२ उताऱ्यात खाडाखोड करून नियमबाह्य पद्धतीने अधिक क्षमतेचे (७.५ एचपी) पंप लाटणे, अनुसूचित जाती (SC) प्रवर्गाच्या आरक्षणावर डल्ला मारणे असे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा मनसेने दिला होता.

आता महावितरण या मेळाव्यांमधून शेतकऱ्यांना खरोखर न्याय देणार की मनसेने उपस्थित केलेल्या शंकेनुसार हे केवळ एक 'नाटक' ठरणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

**महावितरणची सारवासारव: तक्रार निवारण मेळाव्यांचे आयोजन**

मनसेच्या या आक्रमक भूमिकेनंतर आणि वाढत्या दबावानंतर, महावितरणने १६ ते २० एप्रिल दरम्यान बीड जिल्ह्यातील आष्टी, शिरूर कासार, पाटोदा, गेवराई, आंबेजोगाई, माजलगाव, परळी, आणि केज या उपविभागीय कार्यालयांमध्ये 'तक्रार निवारण मेळाव्यांचे' (कॅम्प) आयोजन केले आहे. या मेळाव्यांत महावितरणचे अधिकारी आणि एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहून जागेवरच तक्रारी सोडवतील, असा दावा प्रशासनाने केला आहे.

'कॅम्पचे नाटक थांबवा, थेट गुन्हे दाखल करा'

महावितरणने जाहीर केलेल्या या मेळाव्यांवर कैलास दरेकर यांनी कडाडून टीका केली आहे. त्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले आहेत:

- मनसेने पुराव्यासह निवेदन दिल्यानंतरच महावितरणला अचानक जाग का आली?
- हे कॅम्प शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आहेत की अधिकाऱ्यांनी केलेले कोट्यवधींचे गैरप्रकार दडपून प्रकरण शांत करण्यासाठी आहेत?
- संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी कॅम्प घेण्याचे नाटक करू नये. त्याऐवजी, प्रशासनाने तातडीने एक स्वतंत्र 'चौकशी समिती' नियुक्त करावी. या समितीमार्फत सरसकट सर्व प्रकरणांची छाननी करून दोषी अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सीवर थेट फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत.

**शेतकऱ्यांना आवाहन**

एकिकडे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतानाच, दुसरीकडे कैलास दरेकर यांनी जिल्ह्यातील सर्व अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी या महावितरणच्या कॅम्पमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि आपल्या हक्काच्या पंपासाठी प्रशासनाकडे अधिकृतपणे तक्रारी नोंदवाव्यात.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'ग्रामगीता' आणि अंधश्रद्धा

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनील भगत /प्रतिनिधी दक्षिण नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या *'ग्रामगीता'* या अमर ग्रंथातील *'अंधश्रद्धा निर्मूलन'* या अध्यायावर दोन शब्द आपण पाहणार आहोत.

आपला भारत देश संतांचा, वैज्ञानिकांचा देश आहे. पण आजही २१ व्या शतकात आपण भूत-पिशाच्च, करणी-जादूटोणा, बुवा-बाबा यांच्या जाळ्यात अडकतोआहे.हातात मोबाईल आहे, पण डोक्यात अंधार आहे. याच अंधाराला दूर करण्यासाठी तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता लिहिली.

**तुकडोजी महाराज काय म्हणतात?**

1. "देव दगडात नाही, माणसात आहे"

मंदिरात लाखो रुपये दान करतो, पण शेजारी उपाशी असलेल्या माणसाला अन्न देत नाही. हा कोणता धर्म? महाराज विचारतात – "देवळात दगडाची पूजा, अन् घरात आई उपाशी, असा धर्म तो कोणता सांगा मजसी?" खरा धर्म म्हणजे माणुसकी असायला हवा.

1. आजाराला डॉक्टर हवा, मांत्रिक नको

ताप आला की इंगळी फिरवणारा भगत बुवा आठवतो, पण डॉक्टर आठवत नाही. पोटदुखीसाठी लिंबू-करवंद उतरवतो, पण तपासणी करत नाही. परिणाम? पैसा जातो, जीवही जातो.

महाराज स्पष्ट सांगतात "भूत नाही पिशाच्च नाही, आहे मनाचा भ्रम. शिक्षणाचा दिवा लावा, होईल तेथे ब्रह्म."



1. कर्मकांडाचा बाजार बंद करा

लग्नात १०लाख खर्च करतो पण मुलीला शिकवायला पैसे लावत नाहीत. मेल्यावर तेरवी , वर्षश्राद्ध यात कर्ज काढतो. हुंडा देतोघेतो. हे सगळे थोतांड आहे. महाराज म्हणतात, हे पैसे शाळेवर, दवाखान्यावर खर्च करायला हवे . गावाचा विकास होईल.

1. उपाय काय?

उपाय एकच *शिक्षण आणि विज्ञान*. प्रत्येक घरात मुलगा मुलगी शिकली पाहिजे. 'का?' हा प्रश्न विचारायला शिकले पाहिजे. बुवा म्हणाला म्हणून नवस करणे बंद झाले पाहिजे. "शिका, विचार करा, मग आचरण करा" हा मंत्र महाराज देतात.

शेवटी एकच सांगतो:

तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' लिहून गावाला नवा रस्ता दाखवला. ते म्हणतात, "एक गाव एक देवघर". म्हणजे भांडण नाही, व्यसन नाही, अंधश्रद्धा नाही – फक्त प्रेम, स्वच्छता आणि श्रम.

म्हणून आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले तसे आणि तुकडोजी महाराज म्हणाले तसे – *"शिका, संघटित व्हा, संघर्ष करा"* पण तो संघर्ष अंधश्रद्धेविरुद्ध असू द्या.

गाव सुधारेल, देश सुधारेल.

**उमेश चिट्टे**

# मृत पीडितांच्या ८८९ वारसांना शासकीय नोकरी, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची माहिती

**पुणे :** ॲट्रॉसिटी प्रतिबंधक कायद्यांतर्गत, मृत पीडितांच्या ८८९ पात्र वारस व्यक्तींना शासन सेवेत संधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मंगळवारी दिली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मिसाळ बोलत होत्या. या वेळी पुणे जिल्ह्यातील १८ वारसदारांना मिसाळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. आमदार बापू पठारे, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, सहआयुक्त प्रमोद जाधव, प्रादेशिक आयुक्त वंदना कोचूरे, सहायक आयुक्त विशाल लोंढे आदी या वेळी उपस्थित होते.मिसाळ म्हणाल्या, 'केंद्र सरकारच्या १९८९ च्या ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत अत्याचारग्रस्तांना आर्थिक मदत आणि पुनर्वसनाची तरतूद करण्यात आली होती. राज्यात १९९५ मध्ये हा कायदा लागू करण्यात आला. आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. सन २०१६ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार, खून किंवा मृत्यू झाल्यास अशा मृत पीडित व्यक्तीच्या कुटुंबाला अर्थसाहाय्य किंवा एका व्यक्तीला आवश्यक असल्यास नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार, २०१२ ते २०२५ या कालावधीत एकूण ३२० प्रकरणांत वारसदारांचे पुनर्वसन करण्यात आले. त्यापैकी ४४ वारसांना नोकरी, २६६ वारसांना निवृत्तीवेतन, एका वारसाला जमीन आणि १० वारसांना घरकुल देण्यात आले आहे.''कायद्यातील तरतुदी पुरेशा स्पष्ट नसल्याने पीडितांच्या वारसांना नोकरी देण्याचे प्रमाण खूपच कमी होते. त्यासाठी अधिकाऱ्यांनी शासनाकडून मार्गदर्शन मागविले होते. त्यानुसार, जुलै २०२५ अखेर राज्यात प्रलंबित असलेल्या ८८९ प्रकरणासंबंधी एक वेळची विशेष बाब म्हणून 'ड' संवर्गातील शासकीय पदांवर नियुक्ती देण्यास शासनाने मान्यता दिली.

# पक्षी अन् माणसाची अनोखी मैत्री! मेळघाटातील पायविहीर गावाची ओळख बनली आहे 'लांडोर'



मेळघाटच्या जंगलात वसलेल्या पायविहीर गावात एक अनोखी आणि आश्चर्यकारक गोष्ट पाहायला मिळते. लांडोर या ठिकाणी केवळ जंगलात नाही तर संपूर्ण गावात मुक्तपणे वावरताना दिसते. गावातील प्रत्येक घरात, शेतात, अंगणात आणि शाळेतही ही लांडोर बिनधास्त वावरते. जणू ही लांडोर गावाची सदस्य आहे, असाच तिचा थाट.

**अंड्यापासून सुरू झालेली कहाणी :** "साधारणतः चार ते पाच वर्षांपूर्वी गावातील सिताराम जांभू हे वृद्ध जंगलात लाकडं आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना मोराचं अंडं सापडलं. अंडं सुरक्षित राहावं या हेतूनं त्यांनी ते गावात आणलं आणि कोंबड्यांसोबत ठेवलं. कोंबडीनं त्या अंड्याचा सांभाळ केला. कालांतरानं त्या अंड्यातून लांडोरचा जन्म झाला. सुरुवातीला कोंबड्यांमध्ये फिरणारी लांडोर हळूहळू मोठी झाली. आज ती संपूर्ण गावात मुक्तपणे संचार करतेय," अशी माहिती रामकिसन जांभू या ग्रामस्थानं 'मीडिया'शी बोलताना दिली.

**लांडोर बनली गावची सदस्य :** मागील चार-पाच वर्षांपासून ही लांडोर गावातच फिरत असून प्रत्येक गल्लीबोळ, प्रत्येक घर आणि शेतात तिचा मुक्त संचार दिसतो. ग्रामस्थ तिला गहू, तांदूळ आणि पाणी देतात. लांडोर ही घरांच्या छपरांवर बसते, अंगणात फिरते आणि शेतात अगदी मालकासारखी वावरते.

**मुलांचा जिवलग साथीदार :** "पायविहीर गावातील लहान मुलांसाठी ही लांडोर जणू एक जिवंत खेळण्यासारखी आहे. मुलं तिच्यासोबत खेळतात. तिच्या मागं फिरतात आणि तिच्याशी आपुलकीचं नातं जोडतात. पावसाळ्यात लांडोरचा वावर गावातील आनंद वाढवतो" असं अनिकेत तांडील हा चिमुकला बोलताना म्हणाला.


**पर्यटकांसाठी मोराचं आकर्षण :** "पायविहीर गावात येणारे पाहुणे आणि पर्यटकांसाठी ही लांडोर मोठं आकर्षण ठरतेय. अनेक पर्यटक तिचे फोटो, व्हिडिओ काढतात. तिच्यासोबत सेल्फी घेतात. अनेकदा ही लांडोर शेजारच्या गावांमध्येही फेरफटका मारून पुन्हा गावात परत येते. लांडोर आमच्या पायविहीर गावाची आहे, हे शेजारच्या गावातील प्रत्येकाला माहिती आहे," असं रामकिसन जांभू म्हणाले.

**वनविभागाची माहिती अन् भूमिका :** "वनविभागाच्या अधिकाऱ्यांनाही पायविहीर या गावात असणाऱ्या मोराबाबत संपूर्ण माहिती आहे. लांडोर ही रानटी पक्षी असल्यामुळं तिला घरात ठेवणं गुन्हा मानला जातो. मात्र, या प्रकरणात ही लांडोर कोणाच्या मालकीची नसून संपूर्ण गावची आहे. गावकऱ्यांकडून तिची योग्य काळजी घेतली जात असल्यानं कोणतीही कारवाई आवश्यक नाही," असं एका वन अधिकाऱ्यानं बोलताना स्पष्ट केलं.

**गावातील लांडोरचं खास आकर्षण :**

- गावात लांडोरचा मुक्त संचार
- घरोघरी आणि शेतात लांडोरचा वावर
- लहान मुलांचा आवडता साथीदार
- पावसाळ्यात लांडोर ठरते आकर्षण
- पर्यटकांना फोटो आणि व्हिडिओसाठी मोठं आकर्षण
- ग्रामस्थांकडून लांडोरला दाणापाणी आणि संरक्षण.

## प्लास्टिकच्या बाटलीत घरच्या घरी उगवा ताजा लसूण



**किचनमध्ये दररोज वापरला जाणारा लसूण दिवसेंदिवस महाग होत चालल्याच्या बातम्या आपल्या कानावर नेहमीच पडतात. अशावेळी लसणाच्या वाढत्या किमतींमुळे स्वयंपाकघराचा बजेट बिघडू लागलं आहे. म्हणूनच घरच्या घरीच लसूण उगवता आला तर? विशेष म्हणजे यासाठी मोठी जागा किंवा शेतीची गरज नाही. अगदी छोट्याशा जागेत, प्लास्टिकच्या बाटलीतही तुम्ही सहज लसूण लावू शकता. कसं ते जाणून घ्या..**



घरात पडून असलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, रिकामे डबे किंवा पिशव्यांचा वापर करून लसूण सहज लावता येतो. हा एक सोपा 'किचन गार्डन' आयडिया असून, अगदी कमी जागेत ताजं उत्पादन मिळवण्याचा उत्तम पर्याय ठरतो.

**लागवडीसाठी लागणारे साहित्य**

- २ किंवा ५ लिटरची रिकामी प्लास्टिकची बाटली
- सुपीक माती
- शेणखत किंवा गांडूळ खत
- लसणाच्या पाकळ्या
- छिद्र पाडण्यासाठी गरम खिळा

**लसूण लावण्याची पद्धत**

सर्वप्रथम प्लास्टिकची बाटली स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर बाटलीच्या बाजूंना २ ते ३ इंच अंतरावर लहान छिद्रं पाडा. या छिद्रांचा आकार लसणाच्या पाकळ्यांप्रमाणे असावा. बाटलीच्या तळाला पाण्याचा निचरा होण्यासाठी ३ ते ४ मोठी छिद्रं पाडणं आवश्यक आहे.

यानंतर बाटलीत माती आणि खताचं मिश्रण भरून घ्या. माती भरताना प्रत्येक छिद्राजवळ ती व्यवस्थित बसवून घ्या. आता प्रत्येक छिद्रात एक लसणाची पाकळी अशा प्रकारे लावा की टोकदार भाग बाहेरच्या बाजूला राहील आणि मुळाचा भाग मातीत जाईल.

**सूर्यप्रकाश आणि पाण्याची काळजी**

लावलेली बाटली बाल्कनीत किंवा खिडकीजवळ ठेवा, जिथे दररोज किमान ४ ते ५ तास सूर्यप्रकाश मिळेल. वरून हलक्या हाताने पाणी द्या. माती ओलसर राहील याची काळजी घ्या, मात्र पाणी साचणार नाही याची दक्षता घ्या.


**१०-१५ दिवसांत मिळेल लसूणपात**

अवघ्या १० ते १५ दिवसांत हिरवीगार लसूणपात दिसू लागते. ही पात चटणी, भाजी किंवा विविध पदार्थांमध्ये वापरता येते. साधारण ४ ते ५ महिन्यांनंतर पाने पिवळी पडू लागली की पूर्ण लसूण तयार झालेला असतो.

**घरच्या घरी ताजं उत्पादन**

या पद्धतीने तुम्ही अगदी कमी जागेत, कमी खर्चात आणि सहजपणे ताजा लसूण उगवू शकता. किचन गार्डनिंगची आवड असणाऱ्यांसाठी ही एक सोपी आणि उपयोगी पद्धत ठरू शकते.

# सामान्य माणसाची आर्त हाकः दुर्लक्षित क्षमतेचा टाहो




मी, विजयकुमार कट्टी, आज तुमच्याशी केवळ एक नागरिक म्हणून नाही, तर गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरणाच्या रणांगणात लढणारा तुमचा 'ठाण्याचा ट्री-मॅन' म्हणून संवाद साधत आहे. गेल्या तीन वर्षांपासून मी माझे सर्वस्व—वेळ, पैसा आणि ऊर्जा—हवामान बदलाच्या (Climate Change) वाढत्या धोक्याविरुद्ध लढा देण्यासाठी अर्पण केले आहे. माझे प्रकल्प, मग ते पर्यावरणाशी जुळवून घेणारे (Adaptive) असोत वा कार्बन उत्सर्जन कमी करणारे (Mitigation) असोत, हे केवळ तांत्रिक आराखडे नाहीत; ते आपल्या सर्वांच्या सुरक्षित भविष्यासाठी रचलेले पायाभूत दगड आहेत.

परंतु, हे काम करत असताना मला आलेला अनुभव अत्यंत अस्वस्थ करणारा आहे. आपल्या समाजात अनेक कार्यक्रम 'इव्हेंट' म्हणून मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात, तिथे तासनतास वेळ खर्च केला जातो. पण ज्या विषयावर आज प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कृती करण्याची गरज आहे, तिथे समाजातील धुरिणांकडे साधी २० मिनिटेही नाहीत? हे सांगताना मला कोणतीही तक्रार करायची नाही, तर माझी मानसिक अवस्था तुमच्यासमोर मांडायची आहे. मी आज एका अशा अनिश्चिततेच्या उंबरठ्यावर उभा आहे, जिथे माझ्याकडे क्षमता आहे, योजना आहेत, पण केवळ व्यवस्थेच्या उदासीनतेमुळे त्या अमलात येण्यासाठी मी एकाकी प्रतीक्षा करत आहे. ही प्रतीक्षा थकवणारी आहे, कारण निसर्ग कोणाचीही वाट पाहत नाही.

शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर आपण विनाशाच्या अशा वळणावर आहोत, जिथे दुर्लक्ष करण्याची किंमत खूप मोठी असेल. ज्या वेगाने आपण पर्यावरणाकडे पाठ फिरवत आहोत, तो दिवस आता फार दूर नाही जेव्हा आपल्या देशाचा शेतकरी धान्य पिकवण्याच्या स्थितीत नसेल. जेव्हा जमिनीचा कस संपलेला असेल आणि हवामान अनिश्चित असेल, तेव्हा तुमच्या ताटात अन्न नसेल. त्यावेळी कदाचित तुम्ही जागे व्हाल, पण तेव्हा खूप उशीर झालेला असेल. तुमची कार्यक्षमता अफाट आहे, मग ही साधी समस्या 'जागतिक संकट' बनण्याची वाट आपण का पाहत आहोत? लक्षात ठेवा, सत्ता आणि संपत्ती अन्नाची जागा कधीच घेऊ शकत नाही.


याच संघर्षाचा एक पुढचा भाग म्हणून, मी एक 'पायलट प्रोजेक्ट' सुरू करत आहे—जो 'सिंगल-युज प्लास्टिक' (Single-use Plastic) कमी करण्यावर आधारित आहे. हा प्रकल्प केवळ नियमावलीवर नाही, तर 'काळजी आणि कर्तव्य' या भावनेवर आधारलेला आहे. प्लास्टिकला 'दुसरे जीवन' (Second Life) देऊन त्याचा पुनर्वापर कसा करता येईल, यावर आम्ही काम करत आहोत. वेळ खूप कमी आहे आणि आव्हाने मोठी आहेत. यावर्षी मी 'ग्रीनहाऊस गॅसेस' (GHG) कमी करण्याच्या अनेक संधी घेऊन आलो आहे, जिथे तुमची केवळ उपस्थिती नाही, तर तुमची 'प्रत्यक्ष कृती' मोजली जाईल.


लोकांची उदासीनता पाहून मन अस्वस्थ होते, कारण ज्या कामात तात्काळ वैयक्तिक फायदा दिसत नाही, त्याकडे दुर्लक्ष करण्याची आपली सवय आपल्याला विनाशाकडे ढकलत आहे. रिकाम्या सबबी आणि "बघू, करू" अशा उत्तरांनी आता काम चालणार नाही. माझा हा लढा मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत सुरूच ठेवणार आहे, या आशेने की—माझा हा देह साथ सोडण्यापूर्वी, या व्यवस्थेला जाग येईल आणि माझ्या या निस्वार्थ कामाला खंबीर पाठबळ मिळेल.

मला तुमची दया नको आहे, मला तुमची निष्ठा हवी आहे. माझा प्रकल्प सज्ज आहे, त्याचे गणित शास्त्रीय आहे आणि उद्देश शुद्ध आहे. आता गरज आहे ती फक्त सत्तेत असलेल्या लोकांनी माणसाचा 'चेहरा' बघणे सोडून त्यामागचे 'मिशन' बघण्याची.

**विजयकुमार कट्टी**

# मलायका अरोरा रोज पिते कोरफडीचं पाणी; पन्नाशीतही चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो कायम





वयाच्या पन्नाशीनंतरही चेहऱ्यावर ताजेपणा आणि नैसर्गिक तेज कायम ठेवणाऱ्या मलायका अरोराचा फिटनेस आणि ब्यूटी रूटीन अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतं. तिच्या या ग्लोइंग स्किनमागे महागडी प्रॉडक्ट्स नाहीत, तर एक अगदी सोपा आणि घरगुती उपाय आहे.

**शिस्तबद्ध जीवनशैलीचं गमक**

मलायका तिच्या फिटनेससाठी नियमित व्यायाम आणि संतुलित आहारावर भर देते. कुठेही असली तरी या दोन गोष्टी ती कटाक्षाने पाळते. मात्र, तिच्या सौंदर्यामागे आणखी एक छोटासा पण प्रभावी सिक्रेट आहे.

**कोरफडीचा रोजचा वापर**

अलीकडेच 'कर्ली टेल्स'शी बोलताना मलायकाने सांगितलं की, ती रोज सकाळी ताजी कोरफड तोडून त्यातील गर काढते आणि तो पाण्यात मिसळून पिते. बाजारात उपलब्ध असलेल्या कोरफडीच्या ज्यूसपेक्षा घरच्या ताज्या कोरफडीला ती अधिक प्राधान्य देते. यामध्ये कधी कधी ती भिजवलेले चिया सीड्स किंवा सब्जा सीड्सही घालते, ज्यामुळे या ड्रिंकचे पोषणमूल्य अधिक वाढते.

**त्वचेसाठी आणि आरोग्यासाठी फायदेशीर**

कोरफड केवळ त्वचेसाठीच नाही, तर आरोग्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. त्यामध्ये व्हिटॅमिन A, C, B१२ आणि E यांसारखे घटक असतात. तसेच मॅग्नेशियम, कॅल्शियम, झिंक आणि अमिनो ॲसिडही मिळतात, जे शरीरासाठी आवश्यक असतात.

**पचन सुधारून वाढतं तेज**

कोरफडीमध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात. त्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. पचन व्यवस्थित झालं की त्याचा थेट परिणाम त्वचेवर दिसतो आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.

महागड्या स्किनकेअर प्रॉडक्ट्सपेक्षा हा सोपा आणि घरगुती उपाय करून पाहिल्यास त्वचेला नैसर्गिक ग्लो मिळवणं शक्य होऊ शकतं.

# उन्हाळ्यात स्वतःला हायड्रेटेड ठेवण्यासाठी ५ सर्वोत्तम डिटॉक्स ड्रिंक्स



**१. लिंबू आणि पुदिना डिटॉक्स वॉटर**

लिंबूमध्ये व्हिटॅमिन C भरपूर असते, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते, तर पुदिना पचन सुधारण्यासाठी उपयुक्त ठरतो. हे डिटॉक्स वॉटर तयार करण्यासाठी पाण्यात लिंबाचे काप आणि पुदिन्याची पाने टाकून ते २-३ तास तसेच ठेवावे, त्यामुळे त्यातील गुणधर्म पाण्यात उतरतात आणि हे पाणी आरोग्यासाठी अधिक फायदेशीर बनते. यामध्ये थोडा सब्जा टाकला तर उत्तम.

**२. काकडी आणि लिंबू डिटॉक्स वॉटर**

काकडी शरीराला थंडावा देण्यास मदत करते आणि हायड्रेशन वाढवते. हे डिटॉक्स वॉटर तयार करण्यासाठी पाण्यात काकडीचे काप आणि लिंबाचे तुकडे घालून काही वेळ तसेच ठेवावे, त्यामुळे त्यातील पोषक गुणधर्म पाण्यात मिसळतात आणि हे पाणी अधिक ताजेतवाने आणि आरोग्यदायी बनते.

**३. सफरचंद आणि दालचिनी डिटॉक्स वॉटर**

हे संयोजन वजन कमी करण्यासाठी उपयुक्त मानले जाते. हे डिटॉक्स वॉटर तयार करण्यासाठी पाण्यात सफरचंदाचे काप आणि दालचिनीचा एक तुकडा टाकून ते रात्रभर तसेच ठेवावे, ज्यामुळे त्यातील पोषक घटक पाण्यात उतरतात आणि हे पाणी अधिक फायदेशीर बनते.

**४. संत्रे आणि आलं डिटॉक्स वॉटर**

संत्रे शरीराला व्हिटॅमिन C पुरवतात, तर आलं पचन सुधारण्यास आणि सूज कमी करण्यास मदत करते. हे डिटॉक्स वॉटर तयार करण्यासाठी पाण्यात संत्र्याचे काप आणि थोडं आलं घालून काही वेळ तसेच ठेवावे, ज्यामुळे त्यातील पोषक गुणधर्म पाण्यात उतरतात आणि हे पाणी अधिक आरोग्यदायी बनते.

**५. स्ट्रॉबेरी आणि तुळस डिटॉक्स वॉटर**

स्ट्रॉबेरी आणि तुळस डिटॉक्स वॉटर हे चविष्ट आणि ताजेतवाने करणारे असून त्वचेसाठीही फायदेशीर ठरते. हे तयार करण्यासाठी पाण्यात स्ट्रॉबेरीचे काप आणि तुळशीची पाने घालून काही तास तसेच ठेवावे, ज्यामुळे त्यातील पोषक घटक पाण्यात मिसळतात आणि हे पाणी अधिक आरोग्यदायी बनते.

**डिटॉक्स वॉटरचे फायदे**

डिटॉक्स वॉटर पिण्यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत होते, तसेच पचनक्रिया सुधारते. यामुळे त्वचा अधिक निरोगी आणि चमकदार दिसते. नियमित सेवन केल्यास वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत मिळते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शरीर योग्य प्रमाणात हायड्रेटेड राहते.